No. EAU/ICD/2022-23/159
8/9/2022

# मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र.१/२०२२-२०२३

अधिसभा इतिवृत्त
दिनांक १५ व १६ मार्च, २०२२

अधिसभेची वार्षिक सभा मंगळवार दिनांक १५ व १६ मार्च, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता सर कावसजी जहांगीर दिक्षांत सभागृह, फोर्ट येथे आयोजित केली होती. सदर बैठकीत खालील मान्यवर उपस्थित होते :-

| अनु. क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती १५/३/२०२२ | उपस्थिती १६/३/२०२२ |
|---|---|---|---|
| १. | प्रा. सुहास रघुनाथ पेडणेकर (कुलगुरू) | उपस्थित | उपस्थित |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरू) | उपस्थित | उपस्थित |
| ३. | प्रा. (डॉ.) राजेश श्रीकृष्ण खरात | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ४. | प्रा.(डॉ.) अनुराधा मजुमदार | उपस्थित | उपस्थित |
| ५. | प्रा. (डॉ.) अजय मुरधीधर भामरे | उपस्थित | उपस्थित |
| ६. | प्राचार्य (डॉ.) अनिता आनंद मोहन स्वामी | उपस्थित | उपस्थित |
| ७. | डॉ विनोद प्रभाकर पाटील (संचालक, प. व मु. मं.) | उपस्थित | उपस्थित |
| ८. | डॉ.(सीए.) प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | उपस्थित | उपस्थित |
| ९. | प्राचार्य (डॉ.) किशोर सुखटणकर | उपस्थित | उपस्थित |
| १०. | डॉ. अद्वैत एम.वैद्य | उपस्थित | उपस्थित |
| ११. | डॉ. समिर रमेश कुलकर्णी | उपस्थित | उपस्थित |
| १२. | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | अनुपस्थित | अनुपस्थित |
| १३ | संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय | अनुपस्थित | अनुपस्थित |
| १४ | डॉ. नंदकिशोर रा. मोतेवार | उपस्थित | उपस्थित |
| १५ | डॉ. सुनिल पाटील | उपस्थित | उपस्थित |
| १६ | डॉ. मोहन नामदेव आमृळे | उपस्थित | उपस्थित |
| १७ | प्रा. (डॉ.) विठ्ठल सुबराव शिवणकर | अनुपस्थित | अनुपस्थित |
| १८ | प्रा. (डॉ.) डॉ. नागेंद्रनाथ बेचन पांडे | अनुपस्थित | अनुपस्थित |
| १९ | प्रा. (डॉ.) अनुजा नारायण पळसुलेदेसाई | उपस्थित | उपस्थित |
| २० | डॉ. विठ्ठल बळीराम रोकडे | उपस्थित | उपस्थित |
| २१ | प्रा. (डॉ.) महादप्पा गंगाराम गोंडा | उपस्थित | उपस्थित |
| २२ | श्री. हृषिकेश गजानन पोळ | अनुपस्थित | अनुपस्थित |
| २३ | श्री. संजय बाबूराव शेटे | अनुपस्थित | अनुपस्थित |
| २४ | ॲड. निल गिरीश हेळेकर | उपस्थित | उपस्थित |
| २५ | श्री. हसमुख देवजी रांभिया | उपस्थित | उपस्थित |
| २६ | श्रीमती शिल्पा शशिकांत पटवर्धन | अनुपस्थित | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | डॉ. सुभाष कृष्णा वाघमारे | उपस्थित | उपस्थित |
| २८ | प्रा. वैभव एकनाथ नरवडे | उपस्थित | उपस्थित |
| २९ | डॉ. अनंत नाना लोखंडे | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ३० | प्रा. चंद्रशेखर सदानंद कुलकर्णी | उपस्थित | उपस्थित |
| ३१ | डॉ. निशा मनोज मुनी | उपस्थित | उपस्थित |
| ३२ | प्रा. गुलाबराव बापू राजे | उपस्थित | उपस्थित |
| ३३ | श्री. रविकांत बालकृष्ण सांगुर्डे | उपस्थित | उपस्थित |
| ३४ | प्रा. रविंद्रनाथ सोन्याबापू रसाळ | उपस्थित | उपस्थित |
| ३५ | डॉ. प्रकाश दामोदर दातार | उपस्थित | उपस्थित |
| ३६ | डॉ. आरती प्रसाद | उपस्थित | उपस्थित |
| ३७ | डॉ. सुरेश नामदेव मैंद | उपस्थित | उपस्थित |
| ३८ | डॉ. (श्रीमती) संगिता निवृत्ती पवार | उपस्थित | उपस्थित |
| ३९ | डॉ. मृदूल जगन्नाथ निळे | उपस्थित | उपस्थित |
| ४० | श्री. महादेव बाबुराव जगताप | उपस्थित | उपस्थित |
| ४१ | श्री. प्रदीप बाळकृष्ण सावंत | उपस्थित | उपस्थित |
| ४२ | श्री. प्रविण महादेव पाटकर | उपस्थित | उपस्थित |
| ४३ | डॉ. सुप्रिया गजानन करंडे | उपस्थित | उपस्थित |
| ४४ | श्री. मिलिंद हरीश्चंद्र साटम | उपस्थित | उपस्थित |
| ४५ | श्रीमती शितल स्वप्निल शेठ-देवरूखकर | उपस्थित | उपस्थित |
| ४६ | श्री. निखिल यशवंत जाधव | उपस्थित | उपस्थित |
| ४७ | डॉ. धनराज नीळकंठ कोहचाडे | उपस्थित | उपस्थित |
| ४८ | श्री. शशिकांत काशिनाथ झोरे | उपस्थित | उपस्थित |
| ४९ | श्री. राजन वसंत कोळंबेकर | उपस्थित | उपस्थित |
| ५० | श्री. मंदार सावंत-देसाई, | उपस्थित | अनुपस्थित |
| ५१ | श्री. रविंद्र प्रभुदेसाई, | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ५२ | श्री. धनेश सावंत, | उपस्थित | उपस्थित |
| ५३ | श्री. जहांगीर सेथना | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ५४ | प्रा डी.पी. मेहता | उपस्थित | उपस्थित |
| ५५ | ॲड. वैभव थोरात | उपस्थित | उपस्थित |
| ५६ | फादर मॅगी मुर्झेलो, | उपस्थित | उपस्थित |
| ५७ | श्री. दिपेश मेहता | उपस्थित | उपस्थित |
| ५८ | श्री. राजीव काशिकर | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ५९ | श्री. सुधाकर तांबोळी | उपस्थित | उपस्थित |
| ६० | श्री रूपेश मालुसरे | उपस्थित | उपस्थित |
| ६१ | श्री. साहेबराव घुले | उपस्थित | उपस्थित |
| ६२ | ॲड. अनिल परब (वि.प.स.) | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ६३ | श्रीमती स्वरूपा साळवी | उपस्थित | उपस्थित |
| ६४ | श्री. सुधीर पुराणिक (कुलसचिव) | उपस्थित | उपस्थित |
| ६५ | श्री. श्रीपाद वेलिंग (प्र.संचालक सिंधुदुर्ग उपपरिसर) | उपस्थित | उपस्थित |

सभेची सुरूवात वंदे मातरम या गीताने झाली.

## श्रध्दांजली :

श्री. कांती कोळी, डॉ. सदाशिव देव, श्री. लीलाधर हेगडे, श्री. प्रभाकर जोग, श्री. गुरूनाथ नाईक, श्री. प्रकाश विश्वासराव, श्री. बळवंत मोरेश्वर तथा बाबासाहेब पुरंदरे, श्रीमती. मन्नू भंडारी, श्रीमती. माधवी गोगटे, श्री. चंद्रकांत जाधव, श्री. विनोद दुआ, श्री. के. रोसय्या, डॉ. सुरेश जाधव, सीडीएस जनरल बिपीन रावत, श्री. के. जी. परांजपे, डॉ. भीमराव कुलकर्णी,न्यायाधीश श्री. जी. टी. नानावटी, श्री. चंद्रकांत जोशी, डॉ. धनाजी गुरव, श्री. महेंद्र प्रसाद, श्री. आर. एन. सिंह, श्रीमती. सिंधुताई सपकाळ, न्यायमूर्ती. आर. डी. तुळपळे, श्री. बाळ ठाकूर, श्री. रामदास कामत, प्रा. कृ. ना. वळसंगकर, श्रीमती. रेखा कामत, श्री. सुनील मेहता,श्री. मोहन सकपाळ, श्री. काशीराम चिंचय, श्री. अरूण जाखडे, कवी इब्राहिम अश्क, प्रा. डॉ. एन. डी. पाटील, पं. बिरजू महाराज, ॲड. श्रीकांत शिवदे, ज्येष्ठ पत्रकार व संपादक दिनकर रायकर, गायिका-अभिनेत्री किर्ती शिलेदार, डॉ. अनिल अवचट, श्री. रमेश देव, श्री. गजानन बाबर, श्रीमती संजिवनी रायकर, भारतरत्न लता मंगेशकर, श्री. प्रविण कुमार सोब्ती, श्री. आर. आर. सिंह, श्री. राहुल बजाज, श्री. नरेंद्र लांजेवार, श्री. बप्पी लहरी, श्री. सुधीर जोशी, जनरल. एस. एफ. रॉड्रिग्ज, डॉ. सुभाष पवार, श्रीमती. इदिरांबाई कडू या सर्व महनिय व्यक्तींनी देशासाठी व विविध संस्थांसाठी अनमोल योगदान दिले आहे.

वरील सर्व मान्यवरांच्या दुःखद निधनाबद्‌ल शोक व्यक्त करून सर्व दिवंगतांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली. तद्‌नंतर नियमित कामकाजाला सुरूवात झाली.

## विकासात्मक वृत्तांत/काही उल्लेखनिय बाबी

मुंबई विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोखला गेला आहे. राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्ययन परिषदेकडून (नॅक) कडून मुंबई विद्यापीठाला पाच वर्षा ऐवजी सात वर्षांसाठी मान्यतेची मुदतवाढ मिळाली आहे. पूर्वीच्या सर्वोच्च गुणवत्तेच्या निकषानुसार मुंबई विद्यापीठास ही सात वर्षांची मुदतवाढ मिळाली आहे. यापूर्वी विद्यापीठास २००१ ला "फाईव्ह स्टार" (सर्वाधिक श्रेणी) त्यानंतर २०१२ ला "अ" (सर्वाधिक श्रेणी) प्राप्त झाली होती. याच निकषांवर तिसऱ्यांदा सर्वाधिक गुणांकनासह अ श्रेणी प्राप्त झाल्याने पाच वर्षा ऐवजी सात वर्षांसाठी मान्यतेची मुदतवाढ मिळाली आहे. यानुसार आता मुंबई विद्यापीठाकडे २०२८ पर्यंत नॅकचा दर्जा असणार आहे.

मुंबई विद्यापीठाच्या कुलसचिवपदी श्री. सुधीर पुराणिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सुधीर पुराणिक हे मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे प्रभारी संचालक म्हणून कार्यरत होते. सुधीर पुराणिक हे पाली येथील शेठ जे. एन. पालीवाला महाविद्यालयात भौतिकशास्त्राचे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. एकूण ३४ वर्षांचा त्यांचा शैक्षणिक अनुभव आहे.

मुंबई विद्यापीठातर्फे येत्या शैक्षणिक वर्षात विविध नाविण्यपूर्ण अभ्यासक्रमांना सुरुवात केली जाणार आहे. त्याचबरोबर अनेक उद्योन्मुख, आंतरविद्याशाखीय आणि ट्रांसडिसिप्लनरी संशोधनाला प्रोत्साहन दिले जाणार आहे. नुकत्याच पार पडलेल्या विद्या परिषदेत याबाबत ठराव मंजूर करण्यात आला आहे. विशेष म्हणजे भविष्यकालीन शिक्षण, चौथी औद्योगिक क्रांती आणि नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सांगड घालण्यासाठी विद्यापीठाने महत्वाचे पाऊल उचलले आहे.

क्रीडा शात्रातील शास्त्रोक्त अध्ययन आणि व्यवस्थापनाचे धडे गिरविण्यासाठी विद्यापीठातर्फे सेंटर ऑफ एक्सलेंस इन स्पोर्ट्स सायन्स अँड स्पोर्ट्स मॅनेजमेट या केंद्राअंतर्गत बीकॉम/ बीबीए/ बीएमएस इन मॅनेजमेंट अँड स्पोर्ट्स एडमिनिस्ट्रेशन, बीकॉम/ बीबीए/ बीएमएस इन हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट अँड स्पोर्ट्स स्टडीज, बीकॉम/ बीबीए/ बीएमएस इन स्पोर्ट्स मॅनेजमेंट, बीएस्सी इन आर्टीफिशिअल इंटेलिजंस अँड स्पोर्ट्स अॅनॅलिटिक्स, बीएस्सी इन डेटा सायन्स अँड स्पोर्ट्स स्टडीज या नविन अभ्यासक्रमांना सुरुवात होणार आहे.

याचबरोबर प्रमाणपत्र आणि पदव्यूत्तर प्रमाणपत्र अभ्यासक्रमांनाही मंजूरी मिळाली आहे. यामध्ये सर्टिफिकेट कोर्स इन गार्डनिंग अँड नर्सरी मॅनेजमेंट, सर्टीफिकेट कोर्स इन ऑर्गेनिक फार्मिंग, सर्टिफिकेट कोर्स इन कल्टीव्हेशन ऑफ स्पाईस प्लांट, पोस्ट ग्रॅज्युअट डिप्लोमा इन बायोडायव्हर्सिटी असेसमेंट अँड कन्झर्वेशन या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. त्याचबरोबर या शैक्षणिक वर्षापासून मास्टर ऑफ बिझनेस एडमिनेस्ट्रेशन (इनोवेशन, आंतरप्रुर्नशिप अँड व्हेंचर डेव्हलमेंट) हा नविन अभ्यासक्रम सुरु केला जाणार आहे.

मुंबई विद्यापीठाच्या बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्राच्या वतीने स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित 'निवेदन व मुलाखत तंत्र' आणि 'चित्रकला' या दोन कार्यशाळांचे आयोजन आज करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उदघाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी, कुलसचिव सुधीर पुराणिक यांच्यासह अधिसभा श्री. सदस्य प्रदीप सावंत, श्री. राजन कोळंबकर, श्रीमती शीतल शेठ-देवरूखकर, श्री. महादेव

जगताप, श्री. मिलींद साटम, ॲड. वैभव थोरात आणि श्री. प्रवीण पाटकर यांची उपस्थिती लाभली होती.

शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण करत मुंबई विद्यापीठाने महत्वाचे पाऊल उचलले आहे. आंतरविद्याशाखीय अभ्यासाच्या कक्षा रुंदावण्यासाठी व या क्षेत्रात प्रगत अभ्यास केंद्राची स्थापना करण्यासाठी मुंबई विद्यापीठ आणि म्युएन्स्टर विद्यापीठ यांच्यात शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला. या करारान्वये विद्यापीठात मुंबई-म्युएन्स्टर इन्स्टिटच्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीजची (MMIAS) स्थापना केली जाणार आहे.

मुंबई विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी या पदावर डॉ. (सीए) प्रदीप कामथेकर यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी १८ डिसेंबर, २०२१ पासून त्यांचा पदाचा कार्यभार स्विकारला आहे. तर संचालक ज्ञान स्त्रोत केंद्रासाठी डॉ. नंदकिशोर मोतेवार यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांनी दिनांक ०८ डिसेंबर, २०२१ पासून त्यांचा पदाचा कार्यभार स्विकारला आहे.

मुंबई विद्यापीठाचा वार्षिक दीक्षान्त समारंभ दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्राचे मा. राज्यपाल तथा कुलपती अकृषी विद्यापीठे श्री. भगत सिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या या कार्यक्रमास सन्माननीय अतिथी म्हणून राज्याचे मा. मंत्री, पर्यटन, पर्यावरण व राजशिष्टाचार, श्री. आदित्य ठाकरे, प्रा. सुनील कुमार सिंह, मा. संचालक, राष्ट्रीय समुद्रशास्त्र संस्था, गोवा हे लाभले होते. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर, प्र-कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी, कुलसचिव सुधीर पुराणिक, परीक्षा व मूल्यपामन मंडळाचे संचालक डॉ. विनोद पाटील यांच्यासह अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषदेचे मान्यवर सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता यांच्यासोबत विविध महाविद्यालयांचे प्राचार्य आणि विभागप्रमुख, प्राध्यापक उपस्थित होते. या वर्षीच्या दीक्षान्त समारंभामध्ये पदवी आणि पदव्युत्तर मिळून विविध विद्याशाखांतील एकूण २,१२,५७६ स्नातकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. विविध विद्याशाखेतील २४३ स्नातकांना विद्यावाचस्पती (पी. एचडी) पदवी प्रदान करण्यात आल्या. डॉ. श्रीनिवासन कन्नन यांना संस्कृत विषयात डि. लीट. पदवी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. तर डॉ. मुकुंद चोरघडे यांना रसायनशास्त्र विषयात डि.एस्सी. पदवी देण्यात आली.

मुंबई विद्यापीठाशी सलंग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था आणि विद्यापीठातील शैक्षणिक विभागात शिकत असणाऱ्या गरजू, आर्थिक दुर्बल आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाने मदतीचा हात पुढे करत रुपये १ कोटी ५७ लाख ८२ हजारांचे अर्थसहाय्य केले आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या

विविध चार योजनांच्या अंतर्गत विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य करण्यात आले आहे. यामध्ये पुस्तकपेढी योजनेअंतर्गत ७१ लाख ५१ हजार रुपये, आर्थिकदृष्ट्या गरजू आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ३ लाख १७ हजार ५८० रुपये, महाविद्यालयात शिकणाऱ्या अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी ५८ लाख ८१ हजार ५०० रुपये, तर विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागात शिकत असणाऱ्या एस.सी./एस.टी./डी.टी./एन.टी. विद्यार्थ्यांना २४ लाख ३२ हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य करण्यात आले आहे.

मुंबई विद्यापीठाच्या प्रा. बाळ आपटे विद्यार्थी आणि युवा चळवळ अभ्यास केंद्राच्या वतीने 'स्वातंर्त्यपूर्व आणि स्वातंर्त्योत्तर काळात राष्ट्र उभारणीत विद्यार्थी आणि युवा चळवळींची भूमिका आणि योगदान' या विषयांवर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. १८ आणि १९ जानेवारी २०२२ रोजी आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेत देशभरातील विविध क्षेत्रातील अभ्यासक आणि मान्यवर विद्यार्थी आणि युवा चळवळींशी निगडीत विषयांवर प्रकाश टाकला. पहिल्या दिवशीच्या उद्घघाटन सत्रात आई.सी.सी.आर.चे अध्यक्ष खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांच्या बीजभाषणाने या परिषदेला सुरुवात झाली.

मुंबई विद्यापीठाच्या श्रीमान बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र व राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या सयुंक्त विद्यमाने अंतराळ कन्या कल्पना चावला यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर, प्र-कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी, कुलसचिव सुधीर पुराणिक आणि अधिसभा सदस्या श्रीमती शीतल शेठ देवरूखकर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित ७५ कोटी सूर्य नमस्कार संकल्पामध्ये मुंबई विद्यापीठाच्या क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि शारिरीक शिक्षण विभागाच्या वतीने ३१ लाख ३ हजार ७१७ सूर्य नमस्कारांचे योगदान देण्यात आले. यामध्ये विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील सात जिल्ह्यातील संलग्न महाविद्यालयात क्रीडा विभागाच्या वतीने ८४ महाविद्यालये मिळून २३ लाख ३० हजार ३२८ सूर्य नमस्कार, राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या वतीने ११८ महाविद्यालयाच्या वतीने ७ लाख ३३ हजार ५३१ सूर्य नमस्कार आणि शारीरक शिक्षण विभागाअंतर्गत १४३ सहभागींनी ३९ हजार ८५८ सूर्य नमस्काराचे यामध्ये योगदान दिले आहे.

मुंबई विद्यापीठाच्या हिंदू तत्वज्ञान अध्यासन केंद्रामार्फत दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. "हिंदू धर्म: धर्मग्रंथांचे अन्वेषण, इतिहास,

राजकारण, समाजशास्त्र, अध्यात्म, शांतता आणि पर्यावरणशास्त्र" या विषयांवर ही परिषद आयोजित करण्यात आली होती. दिनांक २५ आणि २६ फेब्रुवारी २०२२ रोजी आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेत देश-विदेशातील मान्यवर आणि संशोधकांनी विविध विषयांवर प्रकाश टाकला. पहिल्या दिवशीच्या उदघाटन सत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. मुकूल कानिटकर, भारतीय शिक्षण मंडळ हे लाभले होते. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर, प्र- कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी यांच्यासह या अध्यासन केंद्रांचे प्रभारी संचालक प्रा. रविकांत सांगुर्डे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक, दादर रेल्वे स्थानक, अंधेरी रेल्वे स्थानक, सोफया महाविद्यालय आणि चर्चगेट रेल्वे स्थानकात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. विशेष बाब म्हणजे राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रम अधिकाऱ्यांनी व स्वयंसेवकांनी या शिबिराचे आयोजन केले होते. मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. रविंद्र कुलकर्णी यांनी छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक येथील रक्तदान शिबीराला भेट देऊन स्वयंसेवकांचे कौतूक केले. या शिबिरात कुलसचिव सुधीर पुराणिक यांच्यासह अनेकांनी रक्तदान केले. विविध ठिकाणी आयोजित केलेल्या या शिबिरांमध्ये ५८३ एवढे युनिट रक्त गोळा करण्यात आले.

अधिसभेची बैठक सुरु होण्याआधी श्री. सुधाकर तांबोळी आणि श्री प्रदिप सावंत यांनी अधिसभेत अधिसभेच्या बैठकीचे व्हीडीओ रेकॉर्डिग करण्याची मागणी केली.

माननीय कुलगुरूंनी अधिसभेच्या बैठकीचे अध्यक्ष हे माननीय कुलपती तथा राज्यपाल महोदय असतात. अध्यक्षांचा प्रतिनिधी म्हणून कुलगुरू हे अधिसभेच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भुषवित आहे. त्यामुळे अधिसभेच्या बैठकीचे व्हीडीओ रेकॉर्डिंग करायचे किंवा नाही याबाबत माननीय कुलपती महोदय यांची अनुमती घेणे आवश्यक आहे सभागृहाच्या भावना लक्षात घेता या संदर्भात माननीय कुलपती महोदय यांच्या कार्यालयाशी पत्रव्यवहार केला जाईल, असे आश्वासन दिले.

**श्री. प्रदिप सावंत** यांनी छत्रपती शिवाजी महाराज व सावित्रिबाई फुले यांच्याबाबत मा. कुलपतीकडून अवमानकारक भाष्य केल्यामुळे कुलपतीचा निषेध व्यक्त केला.

याबाबत मा. कुलगुरूंनी सभागृहास विनंती केली की हे ॲकेडमिक फोरम आहे. इथे कोणत्याही प्रकारचा निषेध व्यक्त करू नये. आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी इतर व्यासपीठ आहेत. सदर बाबीस श्री महादेव जगताप व श्री. वैभव थोरात यांनी अनुमोदन दिले.

**श्री. प्रदिप सावंत** हयांनी दिनानाथ मंगेशकर कला महाविद्यालय हे विद्यापीठ संचलित महाविद्यालय सुरू करण्याबाबत विचार व्यक्त केले. डॉ. कारंडे यांनी हयाबाबत चर्चा केली. प्र-कुलगुरूंनी याबाबत पत्रव्यवहार केला जाईल असे स्पष्ट केले.

**डॉ. वैभव नरवडे, डॉ. सुप्रिया कारंडे, श्री. धनेश सावंत व सुधाकर तांबोळी** हयांनी विद्यापीठ पत्राला उत्तर देत नसल्याबाबत खंत व्यक्त केली. याबाबत मा. कुलसचिवांनी आश्वासन दिले की, पुढील पंधरा दिवसांत आपल्या पत्राना उत्तर मिळतील.

**ॲड. निल हेळेकर** नॅक व विविध अध्यासन केंद्र सुरू करण्यासाठी सर्व अधिसभा सदस्यांचे अभिनंदन केले. हया अभिनंदन ठरावास श्री प्रदिप सावंत यांनी अनुमोदन दिले.

**श्री. मिलिंद साटम** आणि **डॉ. सुप्रिया कांरडे** यांनी वार्षिक अहवाल लवकर मिळत नसल्याबद्ल खंत व्यक्त केली.

**श्रीमती शितल शेठ-देवरूखकर व डॉ. सुप्रिया कारंडे** यांनी इतिवृत्त संक्षिप्त स्वरूपात बनविण्यासाठी ज्या सदस्यांनी मदत केली त्यांचे अभिनंदन केले.

इतिवृत्त मंजुरी करताना डॉ. सुप्रिया कारंडे हयांनी कॅम्पसमध्ये पोलिस स्टेशन सुरू करण्याबाबत सभागृहास विनंती केली. पोलिस चौकी बाबत मा. प्र-कुलगुरूंनी सकारात्मक भूमिका मांडली.

**मा. कुलसचिवांनी** सीसीटीव्ही चे काम सुरू असल्याबद्ल सभागृहास माहिती दिली.

**श्री. महादेव जगताप** हयांनी इतिवृत्तामध्ये दोन स्थगन प्रस्ताव नोंद झाली नसल्याबद्ल माहिती दिली. तसेच संबंधित कार्यवाही अहवाल मध्येही उल्लेख नसल्याबद्ल खंत व्यक्त केली.

इतिवृत्त दुरूस्तीबाबत चर्चा सुरू असताना डॉ. राजे हयांनी कोविड परिस्थितीत शिक्षण घेवू न शकणा-या विद्यार्थ्यांना शासनाच्या माध्यमातून आर्थिक पॅकेज संबंधी चर्चेचा उल्लेख नसल्याबद्द माहिती दिली.

**श्री. सुरेश मैंद** हयांनी परदेशी विद्यार्थी जास्तीत जास्त आकर्षित व्हावेत हयासाठी प्रशासनाने केलेल्या उपाययोजनाची प्रशंसा केली.

श्रीमती शितल शेठ-देवरूखकर यांनी एमटीएनएलला जागा भाडयाने दिली असल्याबद्दल माहिती दिली. त्याच्यासोबत नविन करार झाल्यानसल्याने सभागृहास अवगत करून दिले.

**श्रीमती शितल शेठ-देवरूखकर, प्रा. संगिता पवार व मिलिंद साटम** हयांनी इतिवृत्तामध्ये त्यांनी मांडलेले काही मुद्दे आलेले नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. डॉ. सुप्रिया कारंडे हयांनी कंत्राटी कामगाराचे पगार वाढ केल्याबद्दल प्रशासनाचे आभार मानले.

**डॉ. सुप्रिया कारंडे** यांनी सभागृहात आपले मत मांडताना असे स्पष्ट केले की, कंत्राटी (हंगामी) कर्मचा-यांबाबत श्री. सुधाकर तांबोळी तसेच श्री. प्रविण पाटकर यांनी देखील प्रशासनाकडे वेळोवेळी पगार वाढीबाबत मागणी केली आहे. त्या शासन निर्णयानूसार विद्यापीठाने त्यावर समिती तयार करून त्यावर विचार विनिमय करून हंगामी कर्मचा-यांना कमीतकमी किमान वेतन कायदयाअंतर्गत पगार दयावे. अशा प्रकारचे डॉ. सुप्रिया कारंडे यांनी सभागृहात आपले मत मांडले तसेच श्री. प्रविण पाटकर यांनी पण सभागृहात आपले मत मांडताना स्पष्ट केले की, लता मंगेशकर ॲकॅडमीसाठी जी जागा द्यायवायची आहे. त्या जागेबाबत आणि हंगामी कर्मचा-यांच्या पगार वाढीच्याबाबत त्यांना प्रत्येक वर्षी थोडथोडी पगार वाढीबाबतचा मुद्दा मांडला.

**श्री. सुधाकर तांबोळी** यांनी सुरक्षा रक्षकांना ३५० रू. दिवसांप्रमाणे आणि आता ४०० रू मिळते म्हणजे यामध्ये सर्व साधारणपणे केवळ ५० रू. वाढ करून चालणार नाही, जे सुरक्षा रक्षक २४ तास काम करत असतात त्यांच्या पगारवाढीबाबत थोडा गांर्भियाने विचार करावा. या सर्व बाबींवर कुलसचिवांनी सांगितले की, इतिवृत्त मंजूर करण्यात येत आहे व दुरूस्त केलेला भाग सदस्यांकडे पाठविण्यात येईल.

**डॉ. वैभव नरवडे** यांनी कॅसच्या बाबत सभागृहात मुद्दा उपस्थित केला की, आतापर्यंत किती शिक्षकांनी पैसे भरले आणि विद्यापीठाला किती मिळाले आणि एजन्सीला किती मिळाले या सर्व गोष्टींचा हिशोब मिळणे अपेक्षित आहे. तसेच समितीच्या अहवालाबाबत विचारणा केली आणि ATR चा उल्लेख करावा अशी सभागृहात विचारणा केली असता मा. प्र-कुलगुरूंनी सांगितले की, संबंधीबाबत उल्लेख करून आपणांस पत्र देण्यात येईल.

**डॉ. धनराज कोहचाडे** यांनी आर.आर.सी. बाबत सभागृहात प्रश्न उपस्थित केला की, निश्चित केलेल्या तारखा आल्या पाहिजेत आणि विभागातून कोणत्या तारखेला अपलोड केलेले आहे. तसेच पेट बद्दल चर्चा करण्यात येऊन तसेच स्पेशल सेलच्या अहवालात सांगितले आहे की, रिझर्व्हेशन पॉलिसीचे उल्लघंन केले आहे असे नमूद केले आहे. या संबंधित कुलसचिवांनी सांगितेल की, माहिती घेऊन आपणांस अवगत करण्यात येईल.

**डॉ. सुरेश मैंद** यांनी सभागृहात असा प्रश्न उपस्थित केला की, २०१३ पासून भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. त्यात सीएचबी असेल, कंत्राटी असेल अगदी कामगारासारखी अवस्था प्राध्यापकांची होत असल्याची तक्रार त्यांनी केली. तसेच त्यांना संबंधी बाबत वेगवेगळे मुद्दे सभागृहात उपस्थित केले त्यावर प्र-कुलगुरूंनी सांगितले की, दरम्यानच्या काळात महाविद्यालयांचे व्यवस्थापन मंडळ सुध्दा बद्ल झाले आहे. त्यामुळे थोडा उशीर झाला आहे.

**श्री. सुधाकर तांबोळी, श्री. राजन कोळंबेकर, श्री. प्रदिप सावंत** यांनी महाविद्यालयावर कायदेशीर कार्यवाही का केली जात नाही असे विचारले. त्यावर मा. कुलगुरूंनी परिक्षा विभागाला सुचित केले की अशा गोष्टीसाठी तंत्रज्ञानाचा वापर प्रश्न कर्त्यांना सांगितले की तक्रारी तोंडी करू नका, लेखी तक्रारी करा म्हणजे पुरावा राहिल.

प्र-कुलगुरू यांनी यावर संगितले की, उत्तरे दिली नाहीत तर नियमाने कारवाई होईल.

**ॲड. वैभव थोरात, डॉ. वैभव नरवडे** यांनी केलेल्या पत्रव्यवहार बाबत कुलसचिव यांनी सभागृहात असे सांगितले की, सर्व अधिसभा सदस्यांच्या पत्रांना एका महिन्याच्या आत सकारात्मक उत्तरे दिली जातील.

**ॲड. वैभव थोरात, श्री. प्रवीण पाटकर, श्री. प्रदीप सावंत, श्री. मिलिंद साटम** यांनी कुलसचिव कार्यालयाची स्ट्रेंथ वाढवण्याबाबत विचारणा केली त्यावर प्र-कुलगुरू यांनी व्हीसी फेलोबाबत मंजूरी झालेली आहे प्रक्रियासुद्धा पूर्ण झालेली आहे परंतु कोविडमुळे उशीर झाला असे सांगितले.

चतुर्थ श्रेणीतील महिला कर्मचारी व अधिकारी यांना रूम उपलब्ध करून देण्याबाबत कुलसचिव यांनी चतुर्थश्रेणी महिला कर्मचाऱ्यांची व अधिकारी यांना फोर्ट परिसरामध्ये दोन रूम आणि कलिना परिसरामध्ये दोन रूम एका महिन्याच्या आत उपलब्ध करून देण्यात येतील असे सांगितले.

विद्यापीठाच्या कलिना परिसरातील पार्किंग संदर्भात कुलसचिवांनी सांगितले की, कलिना परिसरातील पार्किंग संदर्भात सन्माननीय अधिसभा सदस्य यांनी केलेल्या सुचनेचा विद्यापीठ प्रशासन नक्की विचार करेल, असे सभागृहाला सांगितले.

**प्रश्नोत्तरांचा तास**

प्रश्नोत्तरांच्या तासात **श्री. निल हेळेकर** यांनी another University of Mumbai has NVCH map with reference NEP 2022 NEP 2020 साठी विद्यापीठाने काय प्रयत्न केले आहे याची माहिती घ्यावी, यावर मा. कुलगुरूंनी सविस्तर माहिती सांगितली. त्यावर डॉ. सुरेश

मैंद, डॉ. सुप्रिया करंडे, डॉ. धनराज कोह्चाडे, प्रा. गुलाबराव राजे व डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी काही सूचना मांडल्या त्या सूचनांचा सकारात्मक विचारण्याचे आश्वासन मा. कुलगुरूंनी दिले. त्यावर मा. प्र-कुलगुरुंनी विद्यापीठाच्या विविध विभागात कार्यशाळा घेण्याचे प्रस्ताव मांडले. डॉ. मृदुळ निळे यांनी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने काहितरी केले पाहिजे. त्यावर प्र-कुलगुरुंनी नविन शैक्षणिक धोरणात काही तरतूदी असल्याचे सांगितले. मा. कुलगुरुंनी अवाहन केले की, डॉ. मृदुल निळे, श्री. सुरेश मैंद यांनी काही ठोस सूचना द्यावे की, तळागाळातल्या विद्यार्थ्यांना कसे सामावून घेता येईल, यावर श्री. प्रविण पाटकर यांनी माहिती दिली. केंद्र सरकार उपग्रहाद्वारे ग्रामिण भागात इन्टरनेट सेवा देणार आहे.

नवीन शैक्षणिक धोरणा संदर्भात माननीय कुलगुरूंनी सांगितले की, नवीन शैक्षणिक धोरणाची अमंलबजावणी ही आपण सर्वांनी करावयाची आहे त्यासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात जिल्हानिहाय कार्यशाळा महाविद्यालयांसाठी व शिक्षकांसाठी विद्यापीठातर्फे घेण्यात येतील.

**मा. कुलगुरुंनी** स्थगन प्रस्ताव घेण्यास सुचविले असता, डॉ. धनराज कोहचाडे यांनी त्यांचे स्थगन प्रस्ताव खालीलप्रमाणे मांडले व त्यांस ॲड. वैभव थोरात यांनी अनुमोदन दिले.

### स्थगन प्रस्ताव

१) विद्यापीठाने अजून पी एच डी प्रवेश परीक्षा व आर. आर. सी. याच वेळापत्रक तयार केलेले नाही.

२) विद्यापीठाने पेठ परीक्षेचे रिझल्ट हे २ मार्क लिस्टच्या स्वरूपात विद्यार्थींना दिले त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये द्विधा निर्माण झाली.

३) विद्यापीठातील हिंदी विभागामध्ये महाराष्ट्र शासनाने घालून दिलेले प्रवेश प्रक्रियेचे नियम पायमल्ली केली. त्यामुळे मराठी भाषिक महाराष्ट्रातील असलेले विद्यार्थ्यांना या प्रवेश प्रक्रिया पासून वंचित राहावे लागले. विद्यापीठाने संबंधित विभाग प्रमुखावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही.

४) मानसशास्त्र विभागात पात्रता नसतानाही परदेशी विद्यार्थिनीला प्रवेश देण्यात आला.

५) ॲकेडमी ऑफ थेटर आर्ट्स या विभागाला मान्यता नसतानाही पी.एच.डी प्रवेशासाठी प्रक्रिया राबविण्यात आली. पेटच्या विषयामध्ये या विभागाचा समावेश नाही. पी.एचडी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून कोणत्याही प्रकारची फेलोशिप दिली जात नाही.

६) सीनॉपॅसिस सादर करण्यापूर्वी विद्यार्थ्यांना दहा हजार रूपये फीज आकारली जाते. कमी करण्यासाठी वारंवार आपणांस विनंती करण्यात आलेली आहे.

७) आदिवासी मुलांसाठी वसतीगृहाची मागणी वारंवार प्रत्येक अधिसभेमध्ये केली जाते पण विद्यापीठाकडून याकडे दुर्लक्षित केले जाते. शासनाकडे कोणत्याही प्रकारचा पाठपुरावा केलेला दिसत नाही.

८) विद्यापीठ व विद्यापीठाच्या संलग्न असलेल्या महाविद्यालयातील प्राध्यापकांवर होणाऱ्या अन्यायाची दखल घेऊन त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही.

९) रिटायर प्राध्यापकांना पेन्शन अजून मिळालेली नाही.

**डॉ. धनराज कोहचाडे** यांनी विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यावर स्थगन प्रस्ताव मांडले. ॲड. वैभव थोरात यांनी यांस अनुमोदन दिले. दोघेही पी.एचडी. गाईड, प्रबंध रद्दीत विकणे, पी.एचडी. प्रक्रियेबाबत असणाऱ्या त्रुटी, विद्यार्थ्यांवर होणारे अन्याय याबद्दल माहिती दिली. श्री. मिलिंद साटम यांनी सदर विषयाला अनुसरुन काही विद्यार्थ्यांना समाज कल्याण शिष्यवृत्ती मिळत नसल्याचे सांगितले. डॉ. मृदुल निळे यांनी मराठी भाषेत लिहिलेले पी.एचडी. प्रबंध इंग्रजीमध्ये भाषांतर करण्याचा मुद्दा मांडला. डॉ. वैभव नरवडे यांनी पी.एचडी. मार्गदर्शक मान्यता देण्यातील अनियमतेचा मुद्दा उपस्थित केला. श्री. रविंद्रनाथ रसाळ यांनी ग्रामिण महाविद्यालयात पी.एचडी. केंद्र वाढविण्याची सूचना केली. श्री. महादेव जगताप यांनी पेट परिक्षेतील गोंधळ यावर मुद्दा मांडला. सदर स्थगन प्रस्तावाला डॉ. विनोद पाटिल आणि मा. प्र-कुलगुरुंनी सांगितले की, शिक्षकांच्या पदोन्नतीमुळे आता भविष्यात गाईडची संख्या वाढेल, शुल्क अनियमततेवर हळु-हळू नियंत्रण आणता येईल.

**श्री. रविकांत सांगुर्डे** यांनी पीएचडी आरक्षण आणि त्यांच्या फीमध्ये सवलत या गोष्टीला पाठिंबा दिला.

**प्र-कुलगुरू** यांनी पी.एचडी. आरक्षणच्या मुद्द्यावर खुलासा दिला की देखरेख गट तयार करून आरक्षण नोंदीनुसार लागू होत आहे की नाही ते विशेष सेल कडून स्थायी समितीतून करूया. तक्रार निवारण कक्षातील तक्रारींना लवकरात लवकर न्याय मिळवून देण्यासाठी स्थायी समिती करून विद्यार्थ्यांच्या तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांचे अर्ज लवकरात लवकर सभा घेऊन निकालात काढण्याची तजवीज केलेली आहे आणि पी.एचडी. आरक्षण प्रवेशाबाबत योग्य प्रकारे होण्यासाठी निरीक्षक हा विशेष कक्षातर्फे नेमून ते तो सर्व जबाबदारीने करेल असे सांगितले. पी.एचडी.च्या शुल्कामध्ये सवलत मिळण्याबाबत लवकरच ते प्रयत्न करत आहेत.

कर्मचारी संख्या कमी असल्यामुळे पी.एचडी. विद्यार्थ्यांना फुल टाईम कामासाठी नेमण्याची प्रक्रियेला संमती दिलेली आहे त्यानुसार विभागाने ही प्रक्रिया पूर्ण करावी असे सांगितले, असे प्र-कुलगुरूंनी आश्वासन दिले.

**डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी** यांनी पॉईंट ऑफ इंफॉर्मेशनच्याखाली आपले मुंबई विद्यापीठाचे संस्कृत विश्व गीत हे अधिसभा सुरू होण्यापूर्वी लावत होतो याची आठवण सभागृहाला करून दिली. ही प्रथा पुन्हा चालू करावी व हे गीत आणि त्याचे मराठीत भाषांतर दीक्षांत सभागृहाच्या दारावर लावण्यात यावे अशी सूचना केली. प्र-कुलगुरूंनी मान्य केले.

**ॲड. वैभव थोरात** यांनी महर्षि दयानंद कॉलेज चे मराठी भाषा विभागाचे पीएचडी सेंटर बंद आहे ते चालू करण्याबाबत प्रस्ताव मांडला असता, प्र-कुलगुरूंनी संबंधित प्रस्तावाला मान्यता दिली.

**डॉ. सुरेश मैंद** यांनी विद्यापीठाच्या वित्त विभागाकडून बिलांच्या मंजूरीसाठी होणारी दिरंगाई व विभागातील सुधारणांचा आभाव असे स्थगन प्रस्ताव मांडले. सदर प्रस्तावास प्रा. वैभव नरवडे यांनी अनुमोदन देताना वित्त विभागाची कार्यक्षमता वाढवण्याबद्दल मत व्यक्त केले. डॉ. सुप्रिया करंडे यांनी विभागात नविन सॉफ्टवेअर आणण्याची सुचना केल्या. वरिल स्थगन प्रस्तावाला वित्त व लेखा अधिकारी यांनी सविस्तर उत्तर देताना म्हणाले की, २०१३ ते २०२० या वर्षाचे अकांऊंटिंग ऑडिट करुन देत आहोत. सध्या Foxpro मध्ये काम करित आहोत. विभागाचे संगणकीकरण टप्प्या-टप्प्याने करण्याचे नियोजन आहे. डॉ. सुरेश मैंद यांनी सुचविले की, विद्यापीठाला मनुष्यबळाची आवश्यकता असताना वाणिज्य विभागातील हुशार विद्यार्थ्यांना इन्टर्नशिप देवून काम करुन घेता येईल.

मा. कुलसचिवांच्या आदेशानुसार डॉ. गुलाबराव राजे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव खालीलप्रमाणे मांडला व त्यांस श्री. रविकांत सांगुर्डे यांनी अनुमोदन दिले.

## स्थगन प्रस्ताव

"That this meeting of the Senate of University of Mumbai be adjourned for ten minutes to express deep concern of the House at the grave situation resulting from COVID 19 pandemic-driven crisis leading to economic, health and educational deprivation of various sections of the society, particularly large sections of students, teaching and non-teaching staff in the jurisdiction of University of Mumbai,"

**डॉ. गुलाबराव राजे** स्थगन प्रस्ताव मांडताना म्हणाले की, दोन महत्त्वाचे विषय आहेत. एक म्हणजे महामारी परिस्थिती व दुसरी म्हणजे नॅशनल एज्युकेशन पॉलिसी. या संबंधित त्यांनी तीन मुद्दे उपस्थित केले. १) पायाभूत सुविधा विकसित करणे २) उप-परिसर कसा राहिला पाहिजे ३) आव्हाने कशा स्वरूपाची राहतील?

**डॉ. गुलाबराव राजे** हयांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत विविध मुद्दे मांडले. यावर प्र-कुलगुरू यांनी सांगितले की, त्याठिकाणी आपण अभिप्राय देणे आवश्यक आहे. विद्यापीठ हे मार्क्स लेव्हलवर घेणारच. अभिप्रायाच्याबाबत प्र-कुलगुरूंनी सांगितले की, प्रत्येकाने सुध्दा अभिप्राय देणे युजीसीच्या पोर्टलवर अपेक्षित आहे. फायनलाझेशन जी अपेक्षा आहे ती सगळया अभिप्राय मिळाल्यानंतर होणार त्यामुळे सर्वांनी सावध व्हावे, असे प्र-कुलगुरू यांनी सांगितले.

**डॉ. रविकांत सांगुर्डे** त्यांना अनुमोदन दिले.

**डॉ. संगीता पवार** यांनी मांडलेल्या स्थगन एकमध्ये पी.एचडी.मध्ये आरक्षण आणि शुल्कामध्ये सवलत याबाबत उदासीनता मांडली दुसरा मुद्दा तक्रार निवारणाच्या कक्षामध्ये तक्रारीचे प्रकरणे जास्त प्रमाणात वाढल्या आहेत त्यासाठी संपर्काधिकारी असावा असे सुचवले. शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांचे घसरते प्रमाण, मुले मुली यांच्या शिक्षणातील असमानता, मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत चाललेली घसरण याबाबत आपली भूमिका मांडली. तसेच नवीन शिक्षण पद्धती एन.ई.पी.मध्ये यासर्व गोष्टींवर विचार व्हावा असे मत डॉ. संगीता पवार यांनी मांडले. त्यांच्या तिसऱ्या स्थगनमध्ये अस्थायी सुरक्षा रक्षक कर्मचारी यांच्याबाबत समान काम समान वेतन हा विषय मांडला.

**प्रा. रविंद्र रसाळ, श्री. दातार, डॉ. सुरेश मैंद, डॉ. चंद्रकांत कुलकर्णी व श्री. मिलींद साटम** हयांनी देखील नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत आपले मत मांडले. यावर

कुलसचिव सांगितले की, कार्यालयातून आपल्याशी कुणीतरी संपर्क साधेल आणि आपण त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करू.

**श्री. धनेश सावंत** म्हणाले की, नवीन शिक्षण धोरणाच्या आव्हानांबाबत म्हणाले की, कुठलीही नवीन गोष्ट बोलल्यावर सुरूवातीला कठीणच वाटते. पण तेव्हढे भिण्याचे कारण नाही. कारण विद्यापीठ हळूहळू संशोधन केंद्रेच बनणार आहेत. आव्हाने कशी पेलायची यासाठी विद्यापीठाने एखादी कार्यशाळा आयोजित करावी.

अधिसभा सदस्यांच्या पत्रांना/ईमेलला उत्तर मिळत नसल्याबद्दल विविध अधिसभा सदस्यांनी नाराजी व्यक्त केली.याबाबत, कुलसचिव यांनी सांगितले की, आजच्या अधिसभेच्या बैठकीत अधिसभा सदस्यांनी उपस्थित केलेले प्रश्न/स्थगन प्रस्ताव तसेच इतर बाबींची पुर्तता करण्यासाठी सर्व अधिसभा सदस्यांना कुलसचिव कार्यालयातुन दुरध्वनीद्वारे संपर्क करून त्यांची वेळ घेण्यात येईल व त्यांनी प्रश्न/स्थगन प्रस्ताव यांच्यावर चर्चा करून सकारात्मक पाऊल विद्यापीठ प्रशासनाकडून उचलण्यात येईल, असे आश्वासन मा. कुलगुरूंनी दिले.

**प्र-कुलगुरू** खुलासा करताना म्हणाले की, नॅशनल एज्युकेशन पॉलिसी ही राज्य व केद्र शासनाने मान्य केलेली पॉलिसी आहे. नॅशनल एज्युकेशन पॉलिसी राबवताना येणाऱ्या आव्हानांना तोंड कसे द्यायचे याचा विचार करावा लागेल.

**प्र-कुलगुरू** म्हणाले की, ते अर्थसंकल्पाच्यावेळी बघू. तुमच्या सूचना लिहून घेतल्या आहेत. ज्या गोष्टी जिथे करणे आवश्यक आहे, तिथे त्या केल्या जातील. प्र-कुलगुरूंनी दिलेल्या आश्वासनानंतर डॉ. गुलाबराव राजे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

मा. कुलसचिवांनी पुढील प्रस्ताव मांडण्यास प्रा. वैभव नरवडे यांना विनंती केली असता प्रा. वैभव नरवडे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव खालीलप्रमाणे मांडला व त्यांस डॉ. सुप्रिया करंडे यांनी अनुमोदन दिले.

<u>स्थगन प्रस्ताव</u>

**"संलग्नीत कॉलेजांवर विद्यापीठ प्रशासनाचा कोणताही अंकुश नसल्याने सलग्नीत कॉलेजांमध्ये होत असलेली मनमानी, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा-२०१६ ची होणारी पायमल्ली आणि विद्यापीठ प्रशासनाचा सुस्त कारभारामुळे विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य आदि ऐकवून सर्व शिक्षण व्यवस्थेतील घटकांचे प्रश्न अत्यंत धीम्या गतीने सुटत आहेत. समाजात विद्यापीठ प्रशासनाविषयी गैरसमज पसरत आहेत. विद्यापीठाने याबाबत गांभीर्याने लक्ष देउन हे सभागृह १० मिनिटे स्थगित करण्यात यावे."**

सदर प्रस्तावावर बोलताना प्रा. डॉ. वैभव नरवडे म्हणाले की, व्यवस्थेमध्ये काही लिखित व अलिखित नियम असतात. उदा. शिक्षकांचे पगार यासंबंधाने. पण ते पाळले जात नाहीत. उदा. तासगावकर महाविद्यालय, राजीव गांधी इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी १०० रूपयांच्या करारनाम्यावर प्रतिज्ञापत्र लिहून घेतो. पण ते याप्रमाणे वागत नाही व आपण त्यांच्यावर काही कारवाई करत नाही.

**डॉ. वैभव नरवडे** पुढे म्हणाले की, प्रत्येक महाविद्यालयाला (College Development Committee) महाविद्यालयीन विकास समिती असते. तिचे महत्त्वपूर्ण काम हे असते की, अर्थसंकल्प तयार करणे आणि महाविद्यालयाचा एकंदरीत कारभार सुरळीत पार पाडणे. त्याचे इतिवृत्त विद्यापीठाला पाठवून द्यायचे असते. अनेक महाविद्यालयांनी ते पाठवलेले नाही व विद्यापीठाने पण त्यांच्यावर काहीही कारवाई केलेली नाही.

तक्रार निवारण विभाग महाराष्ट्र विद्यापीठ कायदयानुसार सेक्शन ७९ नुसार माहितीच्या अधिकाराबाबत माहिती आहे. एकदा शिक्षकाने आपल्या विद्यापीठाकडे तक्रार दाखल केल्यानंतर जास्तीत जास्त ३ महिन्यात त्याच्या तक्रारीचे निवारण झाले पाहिजे. विद्यापीठामध्ये सद्य परिस्थिती काय आहे ? २०१४ ते २०२१ पर्यंत १६३ तक्रारी आज पर्यंत प्रलंबित असून किमान कायदा पाळला पाहिजे. ज्या शिक्षकांवर अन्याय झाला म्हणुन तर त्यांनी आपल्या विद्यापीठात तक्रारी दिल्या आहेत आणि त्यांना आपण न्याय देत नाही. कायदयामध्ये त्याच्यावर निवृत्त न्यायाधीश हे त्यांचे अध्यक्ष आहेत त्यांच्या सभा होतात की नाही होत, त्याला पाठपुरावा करणे अपेक्षित आहे. तेही वेळोवेळी या सगळया शिक्षकांच्या तक्रारीचे तातडीने निवारण होण्यासाठी ही सगळी प्रलंबित पत्रे ती मार्गी लागतील अशा पध्दतीची कार्यवाही त्वरित आपण सुरू करावी आणि तीन महिने सांगितली तर पुढच्या एक महिन्यात याच्यातील अर्धी जरी प्रकरणे सुटली तर त्या शिक्षकांना न्याय मिळेल आणि कायदयाचे पालन होईल.

**श्री. सुधाकर तांबोळी** यांनी सभागृहात सांगितले की, महाविद्यालये जी आहेत ज्यांना मुंबई विद्यापीठाचे ॲफिलिएशन (मान्यताप्राप्त) आहे. त्यापैकी पहिले नाव आहे रूपारेल महाविद्यालयाची परंपरेबाबत न्यु मॉडेल एज्युकेशन सोसायटी,पुणे आणि त्याच्यामध्ये खुप प्रतिष्ठीत विद्यापीठाचे प्र-कुलगुरू, प्रधान सर, शिंदे सर, त्या प्राचार्यानी व त्या सभासदांनी त्या महाविद्यालयासाठी खूप कष्ट घेतलेले आहेत कोविड काळात सगळे महाविद्यालय बंद होते, परंतु सगळयांनी सुरळीतपणे शासनाच्या आदेशाचे पालन, जी काही विद्यापीठानी काढलेली परिपत्रकांचे पालन तंतोतत केलेले आहे. रूपारेल महाविद्यालयाने महाविद्यालय चालू होवून वर्ष संपेल तरीही विद्यार्थ्यांना ओळखपत्र दिलेली नाही आहे. विद्यार्थ्यांचा जिमखाना, कॅटिन बंद आहे. विद्यार्थ्यांचे वसतीगृहे बंद आहे. रूपारेल महाविद्यालयाचे खूप मोठे कॅम्पस आहे. साधारणत: १० एकरचे कॅम्पस आहे आणि या कॅम्पसमध्ये कला,

विज्ञान व वाणिज्य या शाखा शिकविल्या जातात. सेल्फ फायनान्सिंगचे अभ्यासक्रम शिकविले जाते. एम.ए. सी. तिथे होते. हे साधारण पण ३ हजार विद्यार्थी तिथे शिक्षण घेतात. महाविद्यालय चालू झाल्यापासून या सगळया सुविधा बंद केल्या आहेत. एक चांगली कमिठी गठित करावी आणि सगळी चौकशी करावी आणि जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. जे महाविद्यालय व्यवस्थित पण चालू होते ते चालू राहिले पाहिजे.

**श्री. सुधाकर तांबोळी** यांनी अधिसभेत मांडलेल्या परिक्षा विभागातील एविएशनच्या (Aviation) डिग्री संदर्भात ज्या काही चूका झाल्या आहेत त्या विषयांवर माननीय कुलगुरूंनी कुलसचिवांना स्वत: पाठपुरवठा करतील तसेच तो प्रश्न शैक्षणिक परिषदेसमोर ठेवून जे काही पुरावे आहेत ते सर्व पडताळून त्याची शहानिशा करून शैक्षणिक परिषद जो काही निर्णय देईल तो त्या सिनेट सदस्यांना कळविण्यात येईल असे आश्वासन दिले.

एलआयसीच्या कमिटी मधील प्रत्येक सदस्याला त्यांचे वैयक्तिक मत मांडता यावे यासाठी उपाययोजना करण्यात यावी ही सूचना मा. कुलगुरूंनी केली.

**प्रा. रविंद्रनाथ रसाळ** अनुमोदन दिले.

**श्री. रविकांत सांगुर्डे** म्हणाले की, विनाअनुदानित महाविद्यालयांचे जे फि स्ट्रक्चर आहे ते धोकादायक आहे. तर हे फि स्ट्रक्चर विद्यापीठाने ठरवावे. महाविद्यालयांना दिलेली ऑटानॉमी रिव्हयू करावी.

**ॲड. नील हेळेकर** पुष्टी देताना सभागृहास सांगितले की, सीडीसी, प्लॅगॅरिझम आणि पगार न देणे हे विषय अतिशय गंभीर आहेत. अशा महाविद्यालयांना समज देऊन कारवाई करण्यास आपण कमी पडत असू तर त्याची विशेष दखल घेतली पाहिजे. परीक्षा घेण्यासाठी ज्याप्रमाणे आपण क्लस्टर योजना वापरली. तीच पद्धत इतरही विभागांसाठी वापरल्यास सुसूत्रता निर्माण होईल.

**प्रा. प्रकाश दातार** म्हणाले की, वाईट महाविद्यालयांच्या तुलनेत चांगली महाविद्यालये देखील आहेत. त्यांच्याकडे बघून आपण जास्तीत जास्त चांगली कामे कशी करता येतील ते पाहिले पाहिजे.

यावेळी प्र-कुलगुरूंनी आश्वस्त करताना सांगितले की, भरमसाठ फी वाढीच्या बाबतीत कारवाई करताना काही तरतुदी आहेत. त्यानुसार नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत. तसेच ऑटोनॉमस महाविद्यालयांच्या तक्रारी ब-यापैकी निवारण केल्या आहेत. जर युजीसीचे नॉम्स व महाराष्ट्र शासनाचे नॉम्स फॉलो केले नाहीत तर त्या संदर्भात महाविद्यालयांवर ॲक्शन घेण्याचे अधिकार निश्चितच विद्यापीठाला आहेत. मुंबई

विद्यापीठाचा पसारा इतरांच्या मानाने खुपच मोठा आहे. या सगळयांचे रेग्युलर मॉनिटरींग निश्चितच अवघड आहे.

**मा. कुलगरूंनी** यावर संबोधित केले की, याच्या सखोल चौकशीसाठी हा मॅटर परत विद्वत परिषदेसमोर आणला जावा. अशा मॅटरवर कमिटी नेमण्याचे अधिकार विद्वत परिषदेचे आहेत. प्र-कुलगुरूंनी माहिती दिली की, जगताप सरांनी रात्र महाविद्यालयाची यादी मागितली होती. त्यानुसार अशी महाविद्यालये एकुण २८ आहेत.

**डॉ. वैभव नरवडे** यांनी सभागृहामध्ये सांगितले की, ग्रीव्हेन्सबाबत प्रलंबित प्रकरणे निदर्शनास आणून दिली होती.

कुलगुरूंनी माहिती दिली की, त्यातली बरीचशी निकाली निघाली आहेत.

रूपारेल महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या सोयी सुविधा, महाविद्यालयाकडून आकारण्यात येणारे शुल्क व याबाबत अधिसभा सदस्य श्री. प्रविण पाटकर, श्री. प्रदिप सावंत तसेच इतर सदस्य यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाला अनुसरून माननीय कुलगुरूंनी सांगितले की, रूपारेल महाविद्यालयांच्या विविध विषयांबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून अधिकचे शुल्क आकारून योग्य त्या सोयी सुविधा देण्यात येत नाहीत, विद्यार्थ्यांची कमी होणारी संख्या तसेच इतर अनेक विषय/तकारींबाबत, आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता समिती गठीत करण्यात येणार आहे.

**डॉ. संगिता पवार** यांनी आपले स्थगन प्रस्ताव खालीलप्रमाणे मांडले व त्यांस अनुक्रमे डॉ. सुरेश मैंद, डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी आणि श्रीमती शीतल देवरुखकर-शेठ यांनी अनुमोदन दिले.

<u>**स्थगन प्रस्ताव**</u>

1) **That the meeting of Senate be adjourned for 10 Minutes to show and express my deep sense of disturbance and concern of the Senate house and its members towards the gross violation of MPUA-2016 and University Statutes and regulations/norms towards academic & administrative malfunctioning causing serious mental, dignity loss and humiliation of Bahujan Samaj teachers**
   **Seconded by Dr. Suresh Maind**

2) **Adjourned the Senate meeting for 10 minutes to express my protest against practices adopted by University of Mumbai in making education as a commodity market and moving in the order of privatization of education.**
   **Seconded by Dr. Chandrashekhar Kulkarni**

3) **Adjourned the Senate Meeting by 10 Minutes showing concern towards the most deprived employees denied of minimum provisions for their children's education & income hikes in budgetary provision.**
**Seconded by Smt. Sheetal Sheth-Devrukhkar.**

**डॉ. संगीता पवार** यांनी स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून महाविद्यालयामार्फत घटनेचे उल्लंघन होत असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणले. कोरोना काळात कोणत्याही शिक्षकांची नेमणूक झाली नाही पण बहुतांश महाविद्यालयाने मनमानी प्रकारे परस्पर कंत्राटी घडयाळी तासाच्या शिक्षकाची भरती करताना शासनाच्या आरक्षण नियमाचे उल्लंघन होत आहे असे निदर्शनास आणून दिले त्यामुळे अनुसूचित जाती जमातीच्या उमेदवारावर मुंबई विद्यापीठाचा अंकुश असण्याची गरज असल्याचे सांगितले.

**श्रीमती शीतल देवरुखकर-सेठ व प्रदीप सांवत** यांनी कंत्राटी कामगारांच्या मागे आपण खंबीर उभे राहणे गरजेचे आहे, त्यांच्या कामाचा योग्य मोबदला विद्यापीठाने द्यावा. कंत्राटी कामगार कोविड काळातही आणि नेहमीच विद्यापीठात आपले कर्तव्य बजावत असतात तर त्यांच्या मागे विद्यापीठाने खंबीरपणे उभे राहून त्यांच्या कामाचा त्यांना योग्य तो मोबदला लवकरात लवकर द्यावा असे मत मांडले.

नवीन शासन निर्णयानुसार अभ्यास करून अस्थायी कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणी कशी द्यायची त्यासाठी समिती स्थापन केली आहे ती समिती विद्यापीठाच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेऊन जो काही अहवाल असेल तो लवकरच सादर करेल असे संगितले, असे प्र-कुलगुरूंनी आश्वासन दिले.

दुसरा स्थगन प्रस्ताव सभागृहासमोर ठेवताना डॉ. संगिता पवार यांनी बहुजन विद्यार्थीबाबत मांडला. निर्णय घेताना आरक्षणाच्या ५०-५०% नियमाचे पालन होणे गरजेचे आहे, त्याचप्रमाणे तक्रार निवारण समितीतर्फे आरक्षित गटाचे हित साधण्यासाठी लक्ष दिले पाहिजे, असे नमूद केले. निवृत्त न्यायाधीश श्री. देशमुख सर यांच्या समवेत सर्व सदस्यांनी प्रलंबित प्रकरणावर निर्णय घेण्याचा प्रयत्न केला त्याचा पाठपुरावा विद्यापीठाने घेणे गरजेचे आहे, असे मत नांदविले. डॉ. संगिता पवार यांच्या स्थगन प्रस्तावावर डॉ. सुरेश मैंद यांनी अनुमोदन देताना आरक्षित गटावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली आणि घटनेचे पालन अधिक प्रखरपणे कसे होईल हयाबाबतचे मत आपल्या अनुमोदनात मांडले, तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचा अधिकाअधिक फायदा कसा करता येईल हा मुद्दा अधोरेखित केला.

**डॉ. संगीता पवार** यांच्या द्वितीय स्थगन प्रस्तावास डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी अनुमोदन दिले.

**श्रीमती शीतल देवरुखकर-शेठ** यांनी डॉ. संगीता पवार यांच्या तृतीय स्थगन प्रस्तावाला अनुमोदन देताना विद्यापीठातील कंत्राटी कामगारांच्या प्रश्नाला वाचा फोडली. तर श्री. प्रदिप सावंत, डॉ. मृदुल निळे, डॉ. धनराज कोहचाडे, डॉ. रविकांत सांगुर्डे यांनी अशीच भावना व्यक्त केली.

**डॉ. संगीता पवार** यांच्या स्थगन प्रस्तावावर बोलताना श्री. रुपेश मालुसरे यांनी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या सभागृहासमोर आणल्या श्री. महादेव जगताप, डॉ. अजय भामरे यांनी अशाचप्रकारच्या भावना व्यक्त केल्या.

**डॉ. संगीता पवार** यांच्या स्थगन प्रस्तावावर प्र-कुलगुरुंनी सविस्तर उत्तर दिल्यानंतर डॉ. संगीता पवार यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

कुलसचिव डॉ. सुधीर पुराणिक यांनी ॲड. वैभव थोरात यांना त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडण्याची विनंती केली असता ॲड. वैभव थोरात यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस डॉ. धनराज कोहचाडे यांनी अनुमोदन दिले.

<u>स्थगन प्रस्ताव</u>

> आयडॉलकडे प्रशासन करत असलेल्या दुर्लक्ष विद्यार्थी संख्या कमी होत आहे. Law विभागाकडे झालेल्या दुर्लक्षामुळे Law विभागात अनागोंदी निर्माण झालेली आहे. तसेच विद्यार्थ्यांचे प्रश्न, कर्मचारी व अधिकारी यांच्या प्रश्नांबाबत आपण उदासीन असता. सिनेट सदस्यांना दिलेली आश्वासन आपण पुर्ण करत नाहीत. त्याचबरोबर ग्रंथालय, परीक्षाभवन व इतरइमारती व कलिना कॅम्पसची सुरक्षा या विषयांवर लक्ष वेधण्यासाठी हे सभागृह स्थगित करण्यात यावे.

**ॲड. वैभव थोरात** यांनी मांडलेल्या प्रस्तावर श्री. महादेव जगताप यांनी मत मांडताना ऑयडॉलच्या स्टडी मटेरिअल बाबतीत होणाऱ्या दिरंगाईबद्दल चिंता व्यक्त केली. त्याचप्रमाणे डॉ. सुप्रिया करंडे, श्री. प्रविण पाटकर, श्री. शशिकांत झोरे आणि श्री. सुधाकर तांबोळी अशाच प्रकारच्या भावना ॲड. वैभव थोरात यांच्या प्रस्तावर बोलताना मांडल्या.

**ॲड. नील हेळेकर** मुंबई विद्यापीठामार्फत सुरु होणाऱ्या सॅटलाईट सेंटर सभागृहाला अवगत केले. ॲड. वैभव थोरात यांनी मांडलेल्या स्थगन प्रस्तावावर फार सखोल चर्चा झाली. प्रशासानाला पाठविण्यात येणाऱ्या पत्रांचे कोणतेही उत्तर प्रशासन देत नाहीत हयाबाबत सर्वच अधिसभा सदस्यांनी नाराजी व्यक्त केली असता मा. कुलगुरुंनी काही बाबतीत होणारी दिरंगाई मान्य केली पण कठीण परिस्थितही मुंबई विद्यापीठाने बऱ्याच

विषयात प्राविण्य आणि मार्ग काढण्याचा प्रयत्न केल्याची सभागृहाला माहिती दिली. सौ. शीतल देवरुखकर-शेठ, डॉ. रविकांत सांगुर्डे, डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी, यांनी सदर प्रस्तावातील विविध विषयांवर लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

तसेच सभागृहात असेही सांगितले की, विधीचा UMLA ला प्राध्यापकांसाठी जाहिरात चार वेळा देऊनही अर्ज आलेले नाही एडेड जागा असल्यामुळे सरकारची परवानगी लागते. माणसं सेवानिवृत्त होत आहेत. परंतु तेथे भरती केली जात नाही असे मत त्यांनी मांडले. भरतीसाठी परवानगी मिळाली तर वाव मिळेल.

वरील सर्व विषयांवर कुलगुरूंनी सांगितले की, विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद, शैक्षणिक परिषद आणि अधिसभा यात मुख्य अधिकारी असतात त्यांनी तिघांनी मिळून एकत्रितपणे येऊन काम केले तर ८०टक्के अडचणी सुटतील. कुलगुरू, प्र-कुलगुरू आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करतोच आहोत. एक ते दोन वर्षात सर्व प्रकरणे मार्गी लागतील.

**प्र-कुलगुरुंनी** ॲड. वैभव थोरात यांना स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली असता सदर सभागृहाच्या भावना आणि वेळेचा सदोपयोग व्हावा यासाठी ॲड. वैभव थोरात यांनी आपला स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

कुलसचिव यांनी श्रीमती शीतल देवरुखकर-शेठ यांना त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडण्याची विनंती केली असता, श्रीमती शितल देवरुखकर-शेठ यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस श्री. महादेव जगताप यांनी अनुमोदन दिले.

<u>स्थगन प्रस्ताव</u>

> **मुंबई विद्यापीठामध्ये होणारी मराठीची गळचेपी तसेच मराठी भाषेचा प्रचार व प्रसार या वैधानिक जबाबदारीबाबत विद्यापीठाकडून होत आलेली चालढकल या गंभीर व तातडीच्या विषयावर सविस्तर चर्चा घडवून त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही सुचविण्यासाठी हे सभागृह १५ मिनिटे स्थगित करण्यात यावे.**

**श्रीमती शीतल देवरुखकर-शेठ** सदर प्रस्ताव मांडताना सांगितले की, मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य आहे, दुसरा शासनाचा व्यवहार तसेच कनिष्ठ न्यायालय यांचादेखील जो कारभार आहे तोदेखील मराठीमध्येच झाला पाहिजे अशाप्रकारचे शासनाचे पत्रक जारी केलेले आहे. आपल्या विद्यापीठांमध्ये मराठीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी मुंबई विद्यापीठाने ठोस पाऊले उचलावी लागतील.

**श्रीमती शीतल देवरुखकर-शेठ,** श्री. महादेव जगताप व सुधाकर तांबोळी ह्यांनी मराठी भाषेच्या प्रचार-प्रसाराबाबत बाजू सविस्तर चर्चा केली. विविध उपाययोजना व कार्यशाळांबाबत बाजू मांडली.

शासनाची भरती करताना किंवा विद्यापीठाची भरती करताना त्यामध्ये मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक असावे

मुंबई विद्यापीठ कारभार परिपत्रके ही मराठीतूनच असावी.

विद्यापीठाने त्यांच्या पातळीवर मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी परिपत्रक काढावे असे सुचवले.

यावर उत्तर देताना प्र-कुलगुरूंनी मराठी विभागाने मराठी पंधरावडा म्हणून कार्यक्रम साजरे केले हे सांगितले. मराठी भाषा दिन साजरा करण्यासाठी मुंबई विद्यापीठातील मराठी विभागालाच अधिकृत केले गेले आहे.

१४ जानेवारी ते २५ जानेवारी असा आठवडाभर हे कार्यक्रम त्यांनी साजरे केले.
सर्व परिपत्रक मराठीतूनच काढण्यास मान्यता दिली आणि ते त्यांच्यापर्यंत पोहोचण्यात जाईल याची ग्वाही दिली.

महाविद्यालयात प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष परीक्षांची प्रश्नपत्रिका सुद्धा मराठी भाषेतच असतील असे स्पष्ट केले. महाविद्यालयातील सूचना फलक हे मराठीतच असावे असे परिपत्रक काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

**श्री. सुधाकर तांबोळी** यांनी मुंबई विद्यापीठातील वेगवेगळया विभागात मराठी भाषा दिन हा एक दिवस नव्हे तर त्याचा सप्ताह साजरा झाला पाहिजे, अशी सूचना केली आणि मुंबई विद्यापीठातील प्रवेशद्वारावर महान कवियत्री, कवी यांच्या चारोळया मराठीमध्ये लावाव्यात ही सूचना केली. प्र-कुलगुरू यांनी संमती दर्शविली.

**प्र-कुलगुरू** यांनी या सूचनेला लगेच मान्यता दिली व लगेच अमलांत आणू असे सांगितले.

सदर प्रस्तावात श्री. प्रदिप सावंत, श्री. महादेव जगताप, श्री. धनेश सावंत, श्री. रुपेश मालुसरे, श्री. वैभव नरवडे, श्री. सुधाकर तांबोळी, श्री. रविकांत सांगुर्डे, डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी, श्री. राजन कोळंबेकर हया अधिसभा सदस्यांनी सभागृहाला मोलाचे मार्गदर्शन करुन मराठी भाषेचा सार्थ अभिमान व्यक्त केला. मराठी भाषेचा मुंबई विद्यापीठात जास्तीत जास्त वापर होण्यासाठी नवनवीन योजना आखण्याची सूचना प्रशासनाला केली.

सदर प्रस्तावाला उत्तर देताना प्र-कुलगुरु यांनी मराठी भाषा दिन साजरा करण्यासाठी मराठी विभागालाच अधिकृत केलेले आहे. मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी मुंबई विद्यापीठ सर्व प्रकारचे प्रयत्न करणार त्याचप्रमाणे सर्व अधिसभा सदस्यांना कार्यक्रमासाठी आमंत्रण देण्याची सूचना सर्व विभागांना दिली जाईल, असे आश्वासन प्रशासनातर्फे प्र-कुलगुरुं यांनी सभागृहाला दिली.

तद्नंतर प्र-कुलगुरु यांनी श्रीमती शीतल देवरुखकर-शेठ यांना त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली असता त्यांच्या विनंतीस मान देऊन सौ. शीतल देवरुखकर-शेठ यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

कुलसचिवांच्या आदेशानुसार श्री. महादेव जगताप हयांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस श्री. सुधाकर तांबोळी यांनी अनुमोदन दिले.

<u>स्थगन प्रस्ताव</u>

**१. मुंबई विद्यापीठातील विविध विभागातील अनागोंदी कारभार परीक्षा विभाग, आस्थापना, Law, IDOL, A/C, Affiliation, Concol, GAD विविध पदाची भरती/ नेमणूक/enrolment, eligibility इ. विभागातील कारभाराबाबत स्थगन प्रस्ताव मांडत आहे.**

**२. विद्यापीठातील नविन/जुन्या इमारती मधील सध्यस्थिती/वापर /हॉस्टेल्स, ग्रंथालय रानडे भवन, परीक्षा भवन, नॅनो सायन्स इत्यादि इमारतीबाबत.**

**३. ठाणे कॅम्पस व कल्याण उपकेंद्रातील दैयनिय आवस्थेबाबत तसेच तेथिल विद्यार्थ्यांची होत असलेली हेळसांड याबाबत स्थगन प्रस्ताव.**

श्री. महादेव जगताप यांनी परिक्षा विभाग, आस्थापना विभाग, विधी विभाग, आयडॉल, अकाऊंट, कॉलेज संलग्नता आणि विकास विभाग, महाविद्यालय शिक्षक मान्यता युनिट, प्रशासन विभाग, विविध पदांची भरती, नेमणुका, प्रवेश, नावनोंदणी, पात्रता आणि स्थलांतर प्रमाणपत्र विभागाविषयी प्रश्न विचारले.

सदर प्रश्नांबाबत डॉ. विनोद पाटील हयांनी परिक्षा विभागातील प्रश्नाबाबत उत्तर दिले. त्यांनी ऑनलाईन ऑफलाईन परिक्षाच्या परिपत्रकाबाबत स्पष्टीकरण सभागृहाला दिले.

श्री. महादेव जगताप यांनी सभागृहात असा मुद्या मांडला की, कुलगुरू, प्र-कुलगुरू सरांनी कोणीतरी प्रेस घ्यावे आणि ते स्पष्ट करावे की, कुठल्या परीक्षा ऑफलाईन

होणार आणि कुठल्या परीक्षा ऑनलाईन होणार. विधीची परीक्षा सेमिस्टर ६ विधीला पण आहे. विधीच्या परीक्षा तुम्ही ऑफलाइन घेणार की ऑनलाईन घेणार तसेच मागील २०१९ पासून गुणपत्रिकाबाबत चर्चा केली असता, डॉ. विनोद पाटील यांनी सभागृहामध्ये असे सांगितले की, विद्यापीठाचे परिपत्रक स्पष्ट असल्याने, व्यावसायिक (professional) अभ्यासक्रम कसे होतील पारंपारिक (traditional) अभ्यासक्रम कश्या होतील. परीक्षा पत्रिका नमुना कसा असेल अजून गोंधळ होत असेल तर आपण परत एक प्रेस नोट काढूया आणि स्पष्टता करूया.

**श्री. सुधाकर तांबोळी** यांनी सुद्धा दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या विद्यार्थी संख्या कमी होत आहे व दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी महाविद्यालय मिळालेच पाहिजे यावर मत मांडले. दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे संचालक पूर्णवेळ का अर्धवेळ असा प्रश्न त्यांनी व्यक्त केला. दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या सर्व कोर्सेसची जाहिराती न देण्याबाबत प्रश्न उपस्थित केला.

**डॉ. वैभव नरवडे** यांनी सुद्धा दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या संचालकाबद्दल तक्रार केली आहे. दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या एका प्राध्यापकाला सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पाठवल्यानंतर तिथे त्याची कोणत्याही प्रकारची सोय केली नाही आणि त्याच्याशी गर्विष्टपणे वर्तणूक केली.

सर्व दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या प्रश्नाबाबत प्र-कुलगुरू यांनी स्पष्टीकरण केलं की, आत्ताचे शिक्षण हे डिस्टन्स आणि ऑनलाईन या धर्तीवर असेल यूजीसी कडून आपल्याला ग्रँड वन ऑटोनोमी मिळाल्यामुळे १७ नवीन कोर्सेस सुरू करत आहोत. दूरशिक्षण प्लस ऑनलाईन धर्तीवर रत्नागिरीला आणि पालघर येथेही सुरू करण्यात येत आहे.

**श्री. प्रदीप सावंत** यांनी सभागृहात विचारणा केली की, स्थानिक चौकशी समिती प्रत्येक कॉलेजला जाते का? कसे जाणार साडेआठशे कॉलेजला. continuation affiliation सगळया महाविद्यालयाला कुठे जाते permanent affiliation college पण आहे ना. यासाठी तुम्ही वेगळा मेकॅनिझम करा स्थानिक चौकशी समितीमध्ये विलीन करू नका, असे सभागृहात सांगितले. यावर डॉ. अजय भामरे यांनी सांगितले की, सगळया महाविद्यालयामध्ये सेल्फ फायनान्स कोर्सेस आहे. आणि सेल्फ फायनान्स कोर्सला continuation of affiliation ला समिती जाणार आहे.

**डॉ. रविकांत सांगुर्डे** यांनी पण पुढे असा मुद्या उपस्थित केला की, याच्याबद्दल व्यवस्थापन परिषदेमध्ये पण सांगण्यात आलेले की, आपण सागितले प्रत्येक महाविद्यालयाला

आपण एक परिपत्रक काढून माहिती देणार आणि प्रत्येक महाविद्यालयात स्पोर्ट्स डायरेक्ट नियुक्त करा त्यामुळे ते जास्त सोयीस्कर पडेल.

**श्री. निखिल जाधव** हयांनी सभागृहात वेगवेगळया मुद्दयाबद्दल मत व्यक्त केले. त्यांनी सभागृहाला त्रिनीती सॉफ्टवेअर, बौध्दिक स्वास्थ्य, रोटेशन शिफ्ट, अनिवार्य फिजिकल ट्रेनिंग, सीसीटीव्ही, वायफाय बद्दल माहिती दिली. मा. प्र-कुलगुरूंनी श्री. निखिल जाधव यांच्या सूचनेबद्दल धन्यवाद दिले आणि सूचनाचा निश्चित विचार करण्याबद्दल आश्वासन दिले.

**श्री. सुधाकर तांबोळी** आणि **श्री. मिलिंद साटम** हयांनी एमकेसीएल बद्दल सूचना दिल्या. तसेच सुधाकर तांबोळी हयांनी बोगस प्रमाणपत्र पोलिस तक्रारी विषयी माहिती विचारली. याबाबत डॉ. विनोद पाटील हयांनी एमकेसीएल सोबत ऑफलाईन बैठक आयोजित करण्याबाबत आश्वासन दिले आणि सुधाकर तांबोळी हयांना स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली. श्री. सुधाकर तांबोळी हयांनी विनंतीस मान देऊन स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

**डॉ. सुप्रिया करंडे** हयांनी वर्षानुवर्षे मुंबई विद्यापीठाचे बजेट ऑडीट होत नसल्याबद्दल खंत व्यक्त केली.

**मुंबई विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी श्री. प्रदीप कामथेकर हयांनी वर्ष २०२१-२२ च्या सुधारित व २०२२-२३ चा मुळ अर्थसंकल्प सादर केला.**

कुलगुरू, प्र-कुलगुरू आणि अधिसभेचे सन्माननीय सदस्य मी डॉ. प्रदीप कामथेकर, वित्त व लेखा अधिकारी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मुंबई विद्यापीठाचा वर्ष २०२१-२२ च्या सुधारित व २०२२-२३ च्या मुळ अर्थसंकल्प अंदाज आणि आर्थिक स्थितीचा विवरणपत्र यांनी सादर केली. विद्यापीठाचा अर्थसंकल्प सादर करण्याची संधी मला दिल्याबद्दल मा. कुलगुरू, प्र-कुलगुरू, व्यवस्थापन परिषद व वित्त व लेखा समिती यांचे आभार मानले आणि त्यात विशेष प्राध्यापक मेहता सरांनी मार्गदर्शन व सहकार्य केलेले आहे विद्यापीठातील विविध विभाग संस्था कक्ष यांच्या योजना कार्यक्रम व आवश्यकता विचारात घेऊन मान्य कुलगुरू च्या आदेशान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या अनुषंगाने विद्यापीठ व परिसर बीएससी ३६(आय), विद्यापीठ विभाग व आंतर विद्याशाखा अभ्यास मंडळ (बी.यु.आय.डी ४३ (सी)), आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ (बी.एल.एल.ई. ४६ (सी)), परीक्षा व मूल्यमापन मंडळ (बीओई ४८ (सी)), माहिती व तंत्रज्ञान मंडळ (बी.ओ.आय.टी ५० (बी)) व इतर संबंधित कलमान्वये दिलेल्या अधिकारान्वये तयार करण्यात आलेले सन २०२१-२२ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व सन २०२२-२०२३ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रका मसुदा महाराष्ट्र

सार्वजनिक अधिनियम, २०१६ कलम ६४(६)(ऐ) अन्वये मान्यता साठी केले. विद्यापीठाच्या वित्त व लेखा समिती तसेच व्यवस्थापन परिषदेने दिलेल्या मान्यतेचा अनुसरून निश्चित केलेल्या तरतुदीनुसार हा अर्थसंकल्प सादर केला आहे. हा अर्थसंकल्प तीन भागात आहे. या अंदाजपत्रकाचे प्रामुख्याने चार भाग आहेत. एक टोटल बजेट, बजेट डिपॉझिट, रिकरिंग इन्कम एक्सपेंडिचर आणि नोन रिकरिंग इन्कम एक्सपेंडिचर सन्मानीय सदस्यांनी जर पाहिलं तर आपल्याला कळून येईल की मागील वर्षी २०२१-२२ ला आपलं जे बजेट होतं ते ७२४.१४ कोटी होतं. ते २०२२-२३ पुढील वर्षी अंदाजे ८०८.४७ कोटी इतका राहणार आहे. आता पेंडॅमिक च्या धरतीवरती ज्या परिस्थितीमधून आपण गेलो आहे त्या परिस्थितीचा विचार करून आता ३१ मार्च, २०२२ ला वर्ष संपणार आहे. त्यासाठी सुधारित आपलं बजेट आहे ते ५४८.०४ कोटी इतका आहे त्यानंतर आपण जर बजेटच्या अनुषंगाने पाहिला की टोटल एकूण तुट आहे ती २०२१-२२ मध्ये मूळ आपण ७८.८१ कोटी इतकी अपेक्षित होती ती आता या ३१ मार्चपर्यंत जी परिस्थिती आपण गेलो आणि पेंडॅमिक च्या पार्श्वभूमीवरती आपण ३१.३. २०२२ संपणाऱ्या वर्षाकरता एकूण ३०.०३ कोटी इतके अपेक्षित आहे. ही तूट पुढील वर्ष २०२२-२३ मध्ये तर ७३.८८ कोटी इतकी अपेक्षित आहे. यामध्ये प्रामुख्याने भाग असतो की विद्यापीठाला येणाऱ्या त्या वर्षीचा रिकरींग उत्पन्न त्याला आवर्ती उत्पन्न आपण म्हणतो, आणि २०२१-२२ मध्ये ६२२.८६ कोटी अपेक्षित होतं. पण आता ३१ मार्च, २०२२ संपुष्टात येणाऱ्या आर्थिक वर्षात सुधारित ५२६.०५ कोटी इतका आहे. पुढील वर्षी २०२२-२३ मध्ये ७१३.०३ कोटी इतका अपेक्षित आहे, त्याचबरोबर आपल्या आवर्ती खर्च आहे. दरवर्षी होणारा खर्च असतो विविध गोष्टींवरती तो २०२१-२२ मध्ये ५४१.७१ अपेक्षित होता आणि ३१ मार्च, २०२२ ला संपणाऱ्या सुधारित अंदाजपत्रकानुसार तो ४२७ कोटी इतका अपेक्षित आहे आणि मात्र तो पुढील २०२२-२३ वर्षामध्ये ६३२.२३ कोटी इतका अपेक्षित आहे. आपण जर रिकरींग इन्कम आणि रिकरींग एक्सपेंडिचर पाहिलं तर या दोघातल्या फरक आहे तो फरक हा २०२१-२२ मध्ये ८१.१८ कोटी इतका अधिकचा होता म्हणजेसरप्लस होतं आणि ते आता ३१ मार्च, २०२२ ला संपणार वर्ष आहे त्यासाठी सुधारित तो ६६.०५ कोटी खर्च अपेक्षित आहे आणि तोच मात्र पुढील वर्षी २०२२-२३ मध्ये ८०.८० कोटी इतका अपेक्षित आहे याच बरोबर आपल्या अनावर्ती उत्पन्न असते दरवर्षी होणार नाही आहे म्हणजे एका ठराविक घटकासाठी उत्पन्न नसतं आणि तो घटक दरवर्षी असेलच असं नाही असे नॉनरिकरिंग इन्कमजे विद्यापीठाला येणा होतं जे अपेक्षित होत २०२१-२२ ला ते २२.३५ कोटी इतक होतं ते ३१ मार्च, २०२२ ला संपणाऱ्या सुधारित अंदाजपत्रकानुसार २.६६ कोटी इतका अपेक्षित आहे आणि त्या पुढील वर्ष २०२३ मध्ये २१.६६ कोटी इतका अपेक्षित आहे. याचबरोबर आपला नॉनरिकरिंग एक्सपेंडिचर म्हणून पायाभूत सुविधांवरती खर्च वर्षानुवर्ष करतो

आणि त्याच्यामध्ये २०२१-२२ च्या सुरुवातीला १८२.४३ कोटी इतका अपेक्षित होता तो आता ३१ मार्च, २०२२ ला संपणार या वर्षाकरीता सुधारित १२१.०४ कोटी इतका अपेक्षित आहे आणि तो पुढील वर्षी २०२२-२३ मध्ये १७६.६४ कोटी इतका अपेक्षित आहे. आपण नोन रिकरिंग इन्कम आणि नोन रिकरिंग एक्सपेंडिचर पाहिलं तर दोघांचे नेट इफेक्ट पाहिला तर नोन रिकरिंगडेफिसिट २०२१-२२ ला मूळ अर्थसंकल्प अंदाजपत्रकानुसार १०७.०६ कोटी होतं ते ३१ मार्च, २०२२ ला संपणार या वर्षाकरता ११८.०८ कोटी इतके अपेक्षित आहे. मात्र पुढील वर्षी २०२२-२३ या वर्षाकरता १५४.३८ कोटी इतका अपेक्षित आहे. या दोन्हीचा म्हणजे आवर्ती उत्पन्न आवर्ती खर्च अनावर्ती उत्पन्न अनावर्ती खर्च या चौघांचा ताळमेळ आणि नेट इफेक्ट पाहिला तर आपला नेट डेफिसिट ते तुट अपेक्षित २०२१-२२ ला सुरुवातीला होती ती ७८.६० कोटी इतकी होती ती आता ३१ मार्च, २०२२ ला संपणारे सुधारित अंदाजपत्रकानुसार १६.०३ कोटी इतकी आहे आणि मात्र तीच २०२२-२३ वर्षाकरता ७३.८८ कोटी इतकी आहे. आपण याची समरी करण्याचा प्रयत्न केला तर ती समरी साधारणपणे असे दिसेल की रिकरिंग इन्कम २०२१-२२ च्या मूळ ६२२.८६ कोटी सुधारित ५२६.०५ कोटी ३१ मार्च संपणाऱ्या वर्षाकरिता आणि ते पुढील वर्षी ५१३.३ कोटी रिकरिंग एक्सपेंडिचर आपण पाहिलं तर त्यामुळे २०२१-२२ ला ५४१.७१ कोटी होत तेच ३१ मार्च, २०२२ या संपणाऱ्या वर्षाकरता सुधारित ४२७ कोटी आहे आणि तेच पुढच्या वर्षी २०२२-२३ ला ७३२.२३ कोटी इतका असेल या दोघांच्या नेट इफेक्ट पाहिला तर रिकरिंग आपलासरप्लस होतं ते गेल्या वर्षी ८१.१८ कोटी इतका होता अपेक्षित सुधारित मध्ये ३१ मार्च, २०२२ पर्यंत ६६.०५ कोटी इतका असेल आणि पुढील वर्षी मात्र ८०.८० कोटी इतका अपेक्षित आहे. त्याचबरोबर नोन रिकरिंग इन्कम ला २०२१-२२ ला २२.३५ कोटी होत ३१ मार्च, २०२२ ला संपणाऱ्या सुधारित अंदाजपत्रकानुसार २.६६ कोटी इतका आहे आणि तेच मात्र पुढील वर्षी २०२२-२३ मध्ये २१.६६ कोटी इतका अपेक्षित आहे. नॉन रिकरिंगएक्सपेंडिचर २०२१-२२ चा मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकानुसार १८२.४३ कोटी इतक अपेक्षित होतं २०२१-२२ या सुधारित अंदाजपत्रकानुसार १२१.०४ कोटी अपेक्षित आहे आणि तेच मात्र पुढील वर्षी २०२२-२३ मध्ये १७६.६४ कोटी इतक अपेक्षित आहे. आपण नोन रिकरिंग इन्कमएक्सपेंडिचर नेट इफेक्ट पाहिला तर नॉनरिकरिंग डेफिसिट २०२१-२२ ला मूळ अंतर अंदाजपत्रकानुसार १६०.०६ कोटी इतक होत ते सुधारित ३१ मार्च २०२२ ला संपणाऱ्या वर्षाकरीता ११८.०८ कोटी इतका अपेक्षित आहे आणि तेच मात्र पुढील वर्षी २०२२-२३ मध्ये १५४.६८ कोटी इतके अपेक्षित आहे. आपण रिकरिंग आणि नॉन रिकरिंग नेट इफेक्ट पाहिला आपली बजेटची तुट आहे सुरुवातीला २१-२२ मध्ये ७८.६१ कोटी इतक अपेक्षित होती. ती आता या ३१ मार्च, २०२२ ला संपणाऱ्या वर्षाकरता सुधारित १६.०३ कोटी इतकी अपेक्षित आहे आणि तीच

मात्र २०२२-२३ मध्ये ८३.८८ कोटी इतकी आहे. हे आपल्या अर्थसंकल्पात अंदाजपत्रकाची वैशिष्टय़ भरपूर आहे पण त्यातली काही ठळक वैशिष्टये आपल्या समोर मांडीत आहे. यामध्ये आपण बाळासाहेब ठाकरे आर्ट्स अँड कल्चरल सेंटरसाठी ९ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. युनिव्हर्सिटी डिजिटल साठी ५ करोड रुपये या ठिकाणी प्रस्तावित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल रिसर्च सेंटरसाठी ५ करोड रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. ग्राफिटायझेशनमशिने (ग्राफिटायझेशन मशीन) घेण्याचा चाललय त्याकरिता अडीच कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहेत. समाजातील सामाजिक आणि आर्थिक दृष्टया दुर्बल असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अर्थसाहाय्य करण्यासाठी २.१ कोटीची तरतूद या ठिकाणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर आपल्या चांगल्या फॅकल्टीझ आहे. त्यांना आफ्टर रिटायरमेंट रिपेकरण्यासाठी एक कन्फेअरमेंट तयार करण्यासाठी प्रस्तावित आहे त्यासाठी २ करोड रुपये प्रस्तावित आहे आणि विद्यापीठांमध्ये १०० इंटरन्स हे वर्षभर आणि पंचवीस ॲपरेंटिस वर्षभर विद्यापीठामध्ये घेण्याचा या ठिकाणी प्रस्तावित आहे आणि त्यासाठी दोन करोड रुपयांची तरतूद याठिकाणी प्रस्तावित आहे. आपण पाहिलं तर डिजिटल लायब्ररी चा काम आपला आता सुरु जे झालेले आहे. ते पुढील टप्प्यावर नेण्याकरीता यावर्षी २०२२-२३ मध्ये दोन करोड रुपयांची तरतूद प्रस्तावित आहेत. यानंतर नव्याने एक्सलन्स इन थेओरेटिकल कम्प्युटर सायन्स साठी आपण दोन करोड रुपयांची तरतूद २०२२-२३ मध्ये प्रसारित करीत आहोत. याच बरोबर एस्टॅब्लिशमेंट स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स दोन करोड रुपयांची तरतूद याठिकाणी प्रस्तावित आहे. त्यानंतर नवीन लायब्ररी बिल्डींग आता लवकरच आपल्या हातामध्ये येत आहे त्याकरता फर्निचर १ कोटी आणि इक्विपमेंटस् साठी ७० लाख रुपयांची तरतूद याठिकाणी २०२२-२३ मध्ये प्रस्तावित आहे. त्यानंतर विद्यापीठाच्या उमा म्हणून म्हणजे आपले माजी विद्यार्थ्यांच्या संघटनेसाठी १ करोड रुपयांची तरतूद याठिकाणी २०२२-२३ मध्ये प्रस्तावित आहे. त्याचबरोबर टिचिंग नॉनटिचिंग साठीस्टाफ क्वॉर्टरस प्रस्ताव या ठिकाणी १ करोड रुपये तरतूद २०२२-२३ मध्ये प्रस्तावित आहेत. त्याचबरोबर आपलं ब्युटी फिकेशन ऑफ कॅम्पस चालू आहेत आणि ते पुढील टप्प्यावर नेण्यासाठी पुढील २०२२-२३ मध्ये या ठिकाणी एक करोड रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे कॅम्पस डेव्हलपमेंट सुद्धा पुढील टप्प्यावर नेण्यासाठी यावर्षी २०२२-२३ मध्ये आपण १ करोड रुपया प्रस्तावित करत आहोत युनिव्हर्सल हयुमन व्हॅल्यू सेल साठी ५० लाख रुपये तरतूद आपण २०२२-२३ मध्ये केलेली आहे. उत्कृष्टता क्रीडा आणि विज्ञान आणि व्यवस्थापन (एक्यलेंस स्पोटर्स् ॲड सायन्स ॲड मॅनेजमेंट) याकरता नव्याने आपण एक चाळीस लाख रुपयांची तरतूद २०२२-२३ मध्ये प्रस्तावित करत आहोत. त्याच बरोबर आपल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मॉडेल कॉलेज, अंबवडे ला आहे तिथे मिनीबस करता ४० लाख रुपयांची तरतूद २०२२-२३ मध्ये प्रस्तावित करत आहोत. त्याच बरोबर सेंट्रल इन्स्टिटयुशन

फॅसिलिटिस याकरता २०२२-२३ मध्ये आपण २५ लाखांची तरतूद प्रस्तावित करत आहोत. आपल्याकडे आजादी च्या अमृत महोत्सव चालू आहे तो १५ ऑगस्ट पर्यंत चालणार आहे त्याकरता सुद्धा यावर्षी आपण अधिकची २५ लाखांची तरतूद याठिकाणी २०२२-२३ मध्ये प्रस्तावित करत आहोत. त्याच बरोबर सेंटर फोर नॅशनल इंटरनॅशनल स्टुडंटस् लिंकेजेस २५ लाखांची तरतूद याठिकाणी नव्याने आपण २०२२-२३ मध्ये प्रस्थापित करीत आहोत. आपण पाहिलं तर आपल्या सबकॅम्पस आहेत रत्नागिरी, ठाणे, सिंधुदुर्ग, रायगड. पालघर या सर्व ठिकाणी पायाभूत सुविधा परीक्षण करता तयार करून त्या ठिकाणी विकेंद्रीकरण करणे त्यांना सक्षम करणे याच्यावर गेले दोन दिवसात बोललं गेलं त्या करता या बजेटमध्ये २०२२-२३ मध्ये रत्नागिरी साठी २० लाख ठाणे साठी वीस लाख सिंधुदुर्ग साठी वीस लाख आणि रायगड, पालघर साठी प्रत्येकी पंधरा लाखांची तरतूद २०२२-२३ मध्ये प्रस्तावित केलेली आहेत. आपल्याकडे मुंबई म्युच्युअल इन्स्टिटयुट ॲडव्हान्स स्टडी साठी पंधरा लाखांची तरतूद २०२२-२३ मध्ये प्रस्तावित केलेली आहे. त्याचबरोबर आपल्या विद्यापीठाचे भूषण आहे की, महाराष्ट्रामध्ये आपलं असं विद्यापीठ आहे ज्यांनी अकॅडमी ऑडीट पोर्टल फॅसिलिटी टू स्टेट युनिव्हर्सिटी महाराष्ट्र स्टेट चालू केलेली आहे आणि ज्याचा फायदा महाराष्ट्रातील इतर विद्यापीठ घेत आहेत आणि त्याकरता बारा लाख रुपयांची तरतूद याठिकाणी २०२२-२३ मध्ये प्रस्तावित आहे. त्याचबरोबर मराठी भाषेचा विस्तार आणि प्रसार आणि वापरआपल्या शितल ताईंचे सुद्धा मगाशी प्रस्ताव होता. त्या करता आपल्याकडे पाच लाख रुपयांची वेगळी तरतूद ज्याने आपले विद्यापीठाचे कामकाज मराठीतून चालेल आणि यासाठी ही तरतूद २०२२-२३ मध्ये करण्यात आलेली आहे. या ठिकाणी आपण पाहिलं तर हे जे काही रिवाईसमध्ये ओरिजनल अर्थसंकल्पाचा तुलनेमध्ये आपला दिसतय दुर्देवाने गेल्यावर्षी होतं कारण ह्या पूर्ण वर्षामध्ये कधी २५% कधी ५०% असा या ठिकाणी निर्बंध होते. त्यामुळे पूर्ण आपलं जे काही अर्थसंकल्प होते म्हणजे आपल्या अंदाजित खर्च आणि अंदाजित उत्पन्न हे प्रत्यक्षामध्ये येऊ शकले नाहीत म्हणून आपलारिवाइजस् मधले आकडे कमी झालेले दिसतात त्याच्यावरती पेंडॅमिकचा परिणाम दिसू शकतो आणि त्यामध्ये तो परिणाम अंतर्भुत दिसतो आहे. यानंतर जर आपण डेफिसिटपाहिलं एक गोष्ट प्रामुख्याने सन्मानीय सदस्यांनी नोंद घेण्याची गरज आहे की ज्या वेळेला बजेट प्रिपेअर होत केंद्र पातळीवर असेल, राज्य पातळीवर असेल, लोकल प्रशासन पातळीवर असेल, या विद्यापीठ पातळीवर असेल जेव्हा सेवाभावी संस्था त्या ठिकाणी बजेट प्रेझेंट करतात ते नेसेसरिली डेफिसिट बजेट असतात कारण तिथे काम करण्यावरतीखर्च करण्यावर जास्त भर असतो आणि म्हणूनच सर्व बजेट तुटीचे असतात मात्र असे तुट आपल्या बजेटमध्ये प्रस्तावित आहे ते आम्ही कुठे भरून काढणार त्याकरता आपण जर इथे पाहिल आपल्याकडे सीएसआर फंडिंग आहे कॉन्फरन्स वर्कशॉप सेमिनार ज्यावेळी होतात त्या वेळेला आम्हीस्पॉन्सर घेतो रजिस्ट्रेशन

फीस घेतो त्यामधून उत्पन्ना येत असतं त्यानंतर जास्तीत जास्त निदक आर. एन.टी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्टच्या माध्यमातून आणून त्या ठिकाणी तूट भरून काढण्याचा प्रयत्न त्यानंतर आपली ॲल्युमनी आहे ते ॲल्युमनी सदना आहेत. त्यांच्याकडे वेळोवेळी आपण मोबिलायझेषन फंडस् करून सुद्धा तुट भरून काढण्याचा प्रयत्न करतो. त्यानंतर आपल्याकडच्या पायाभूत सुविधा आहेत. तरी जास्तीत जास्त वापर करून त्यात उत्पन्ना जनरेट करून त्यास मधून येणार उत्पन्न आणि आपण आपले तुट भरून काढण्याचा प्रयत्न करणार आहोत आणि त्याचबरोबर ज्या वेळेला एखाद्या खर्च केला जातो तर तो खर्च आपण प्रॉपर प्रोसिजरने फास्टट्रॅकने वेळेमध्ये केला तर त्यामुळे अनावश्यक होणारा खर्च आणि त्यातून येणारे इंट्रेस आणि पेनल्टी अशी विविध खर्च आपण कट डाऊन करू शकलो तर कॉस्ट कंट्रोल टेक्निकल ची अशी तुट भरुन काढता येते.

त्यानंतर मी सन्माननीय सदस्यांचे या ठिकाणी आभार मानतो आणि महत्वाचा भाग एक आहे ज्या ठिकाणी आता त्याच्या वरती सन्माननीय सदस्यांचे काही दुरुस्त्या सूचना आलेले आहेत.

**डॉ. चंद्रशेखर कुलकर्णी, डॉ. निशा मुनी, श्री. मिलिंद साटम, डॉ. डी.पी. मेहता, डॉ. मृदुल निळे** हयांनी अतिशय चांगल अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल अभिनंदन केले.

**श्री. रूपेश मालुसरे** हयांनी आपल्या विद्यापीठाशी ॲल्युमनी असोशिएशन मजबुत करण्याबद्दल मत व्यक्त केले. याबाबत मा. कुलगुरूंनी सभागृहाला सविस्तर माहिती दिली. असोसिएशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, प्लेसमेंट, प्रोफेशनल लेबल मिळू शकेल. तसेच सध्या आवश्यक बद्दल व भविष्यातील नियोजन करावे लागणार असल्याबद्दल मत व्यक्त केले.

**प्रा. डॉ. अजय भामरे** यांनी श्री. रुपेश मालुसरे यांच्या शिक्षकेतर कर्मचारी या मुद्द्याबाबत सहमती व्यक्त केली. त्याशिवाय निवृत्ती कर्मचारी योग्य पेन्शन यांच्या पेन्शन बाबतीतला प्रश्न सोडवण्यासाठी सर्व अधिकारी आणि कुलगुरू यांच्या सहमतीने एक सभा घेऊन त्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधणार आहेत, असे प्र-कुलगुरूंनी आश्वासन दिले.

**श्री. महादेव जगताप** यांनी सभागृहात असा प्रश्न उपस्थित केला की, विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचे अजूनपर्यंत stamping झालेले नाहीत तसेच अजूनपर्यंत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या पेन्शनचा प्रश्न सूटलेला नाही अशा वेगवेगळया मुद्यांवर चर्चा झाली असता, प्र-कुलगुरूंनी त्याबाबत असे सांगितले की, संबंधित विषयांबाबत प्रशासन काळजी घेत असून पूर्वी झालेल्या चूका परत होणार नाही आणि भविष्यात असे कर्मचाऱ्यांचे प्रश्न उपस्थित होणार नाही, असे सभागृहात सांगितले.

**डॉ. सुरेश मैंद** हयांनी श्री. प्रदीप कामथेकरांचे अभिनंदन केले व अर्थशास्त्र विभागाचा सल्ला घेण्यासंदर्भात विनंती केली.

**मा. अध्यक्षांच्या** परवानगीने डॉ. वैभव नरवडे यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव सादर केला व त्यांस डॉ. सुप्रिया करंडे यांनी अनुमोदन दिले.

<u>स्थगन प्रस्ताव</u>

> **"संलग्नीत कॉलेजांवर विद्यापीठ प्रशासनाचा कोणताही अंकुश नसल्याने सलग्नीत कॉलेजांमध्ये होत असलेली मनमानी, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा-२०१६ ची होणारी पायमल्ली आणि विद्यापीठ प्रशासनाचा सुस्त कारभारामुळे विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य आदि ऐकवून सर्व शिक्षण व्यवस्थेतील घटकांचे प्रश्न अत्यंत धीम्या गतीने सुटत आहेत. समाजात विद्यापीठ प्रशासनाविषयी गैरसमज पसरत आहेत. विद्यापीठाने याबाबत गांभीर्याने लक्ष देउन हे सभागृह १० मिनिटे स्थगित करण्यात यावे."**

**मा. प्र-कुलगुरूंनी** उपरोक्त बाबत सभागृहाला माहिती दिली व स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली. सदर विनंतीस मान देऊन प्रा. वैभव नरवडे यांनी स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

**प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी** यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस प्रा. रविंद्रनाथ रसाळ यांनी अनुमोदन दिले.

<u>स्थगन प्रस्ताव</u>

> **"That this meeting of the Senate of University of Mumbai be adjourned for ten minutes to express strong sentiment of the House at gross violation of university statutes and provisions of Maharashtra Public Universities Act, 2016 by several institutions and failure of University Administration on numerous fronts causing grave hardship to teachers, non-teaching staff and students in the University departments and colleges."**

**डॉ. सुनिल पाटील यांनी डॉ. प्रदिप कामथेकर** यांच्या विनंतीवरुन उपरोक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असलेली शिष्यवृत्ती फेलोशिपसंबंधी सविस्तर माहिती दिली. डॉ.

चंद्रशेखर कुलकर्णी यांनी डॉ. प्रदिप कामथेकर यांचे उत्तम अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल अभिनंदन केले व स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

**डॉ. गुलाबराव राजे** यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस प्रा. रविंद्रनाथ रसाळ यांनी अनुमोदन दिले.

**स्थगन प्रस्ताव**

> **"That this meeting of the Senate of University of Mumbai be adjourned for ten minutes to express deep concern of the House at the grave situation resulting from COVID 19 pandemic-driven crisis leading to economic, health and educational deprivation of various sections of the society, particularly large sections of students, teaching and non-teaching staff in the jurisdiction of University of Mumbai,"**

महिला संशोधनसाठी तरतुद आहे. महिलांसाठी शिष्यवृत्ती सुरू केली पाहिजे, असे मत त्यांनी मांडले.

प्राणीशास्त्र विभागाने काही पुस्तके छापली, परंतू पुस्तक विक्रीतून जमा झालेला निधी कुठे हि बजेटमध्ये हायलाईट झालेला नाही. इलेक्ट्रिसिटी बराच खर्च झालेला आहे. याबाबत माहिती विचारली. रत्नागिरी सबसेंटर मध्ये टयूशन फिस व प्रासंगित फिस मध्ये तफावत आहे. २ कोटी जमा होणार आहे व दुस-या बाजूला सैलरी कॅम्पोनट वाढलेला आहे. रत्नागिरी उपकेंद्रातील फेलोशिप एक हजाराची तरतुद आहे. जी कमीत कमी पाच लाखांची करावी, असे सुचविले. लायसन्स फी पस्केपेचर गेल्या वर्षी पन्नास हजार तरतुद होती. हया वर्षी पाच लाख आहे. इतकी प्रचंड वाढ का ? याबाबत माहिती विचारली.

**डॉ. प्रदिप कामथेकर** यांनी श्री गुलाबराव राजे हयांच्या उपरोक्त प्रश्नाबद्दल उत्तर दिले. मा. कुलगुरुंनी स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली असता मा. कुलगुरुंच्या विनंतीस मान देऊन डॉ. गुलाबराव राजे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

गरवारे इन्स्टिटयुट मधिल टेलिफोन व विदयुत वापराबाबत.

विद्यापीठातील कर्मचा-यांच्या पाल्यासाठी काय सुविधा आहेत. त्यासाठी विद्यापीठ किती व्याजदर आकारतो.

ह्या विषयावर सविस्तर चर्चा झाली मा. प्र-कुलगुरूंनी, श्री महादेव जगताप यांना विनंती केली की, त्यांनी स्थगन प्रस्ताव मागे घ्यावा. विनंतीस मान देऊन श्री महादेव जगताप ह्यांनी स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

पे अॅन्ड अॅलायेन्स टू टेम्परररी स्टाफ, एन.एस.एस.साठी कीती प्रोव्हिजन आहे. याबाबत माहिती विचारली. तसेच अॅकडमिक ऑफ अॅडमिस्ट्रेशन करियर, लोककला अकादमी, व Regarding Sport Activities साठी किती तरतूद आहे. याबाबत माहिती विचारली.

**डॉ. विनोद पाटील** यांनी उपरोक्त प्रश्नाबाबत उत्तर दिले आणि स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली. श्री राजन कोंळबेकर यांनी स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

मिसलियंस सेवानिवृत्त कर्मचा-यांना सत्कार करण्यासाठी तरतुद आहे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांमध्ये सत्कार करण्यासंबंधी भेदभाव नको.

GAD Recurring account expenses head no.23(3) VPC centre.

एक लाखाची तरतुद आहे जी कमीत कमी दोन लाखाची असावी.

**डॉ. प्रदिप कामथेकर** यांनी उपरोक्त प्रश्नाबद्दल माहिती दिली व स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली. त्यानुसार डॉ. संगिता पवार यांनी स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

फ्रेंच विभागातील वेतन अनुदानाबाबत

**डॉ. प्रदिप कामथेकरानी** संबंधित प्रश्नाबाबत माहिती दिली डॉ. विनोद पाटील यांनी स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली. विनंतीस मान देउन श्री रविद्रनाथ रसाळ यांनी स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

मा. कुलसचिव **श्री सुधिर पुराणिक** यांनी २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक आणि २०२१-२२ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक ही बाब मंजूर झालेली आहे असे जाहिर केले. **श्री. राजन कोळंबेकर** व इतर सदस्यांनी अनुमोदन दिले.

त्यानंतर **बाब क्र. ५** : Annual Accounts for year 2013-2014, 2014-2015 & 2015-2016, Balance Sheet as on 31st March, 2014, 31st March, 2015 and 31st March 2016 and Audit Reports 2013-2014 & 2014-2015 and 2015-2016 along with the remarks & compliances of the office for the approval of the senate. सादर केली असता पुढीलप्रमाणे ठराव मंजुर केला.

It was resolved & confirms Annual Accounts for the year 2013-2014, 2014-2015 & 2015-2016 Balance Sheet as on 31st March 2014, 31st March 2015 and 31st March 2016 and Audit Reports 2013-2014, 2014-2015 & 2015-2016 along with remarks of Finance & Accounts Committee by the Senate.

बाब क्र. ५ च्या मंजुरीनंतर मा. कुलसचिवांनी **बाब क्र. ६** The Draft Statutes prescribing the norms for grant of autonomy to the University school, Centres, Departments as per Annexure prepared by the Statute Committee and recommended by the Management Council is being placed before the Senate as per provisions of the Sections 72(9) of the Maharashtra Public Universities Act,2016 for the approval. सादर केली असता पुढीलप्रमाणे ठराव मंजुर केला.

दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बाब क्रमांक १४ अन्वये मान्य केलेला ठराव अधिसभेत सर्वानुमते मान्य करण्यात आला व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७२ (४) अन्वये सदर मसुदा परिनियम मा. कुलपतीकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावे असे ठरले.

त्यांनतर अधिसभेपुढे **बाब क्र. ७** Draft of statutes pertaining to appointment of Head/Director of University Departments/ Centre/School and Institutes as per Annexure prepared by the Statutes Committee and recommended by the Management Council is being placed before the Senate as per the provisions of the Sections 72(9) of the Maharashtra Public Universities Act, 2016 for the consideration and approval. सादर केली असता पुढीलप्रमाणे ठराव मंजुर केला.

दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ च्या व्यवस्थापन परिषदेच्या बाब क्रमांक १५ अन्वये मान्य केलेला ठराव अधिसभेत सर्वानुमते मान्य करण्यात आला व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७२ (४) अन्वये सदर मसुदा परिनियम मा. कुलपतीकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावे असे ठरले.

नंतर **बाब क्र. ८** Draft of Statutes prescribing the norms for unfair means in Examination. सादर केली असता पुढीलप्रमाणे ठराव मंजुर केला.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७२ (४) अन्वये सदर मसुदा परिनियम मा. कुलपतीकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावे असे ठरले.

यांनतर मा. कुलसचिवांनी **बाब क्र. ९** Recommendation for Honorary Degree of D.Litt to Shri Shashikantji Garware, Chairman and Managing Director, Garware Hi Tech Films Limited. सादर केली असता पुढीलप्रमाणे ठराव मंजुर केला.

दिनांक ११ मार्च, २०२२ व्यवस्थापन परिषदेच्या बाब क्रमांक २ अन्वये मान्य केलेला ठराव अधिसभेत सर्वानुमते मान्य करण्यात आला श्री. श्रीकांतजी गरवारे, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, गरवारे हाय टेक फिल्म्स लिमिटेड यांना मानद पदवी डी.लिट देण्याच्या प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

मा. कुलसचिव **श्री सुधिर पुराणिक** यांनी २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठी असलेल्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक आणि २०२१-२२ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक ही बाब मंजूर झालेली आहे, असे जाहिर केले.

**श्री. राजन कोंळबेकर** व इतर सदस्यांनी अनुमोदन दिले. मा. कुलसचिवांनी बाब क्र.५ मंजुरीनंतर बाब क्र. ६ सादर केली "Draft Statutes, Grant of autonoms to the University school, Centre, Departments, etc."

सदर बाब अध्यक्षाच्या परवानगीने डॉ. सुनिल पाटील सभागृहात मांडली याबाबत डॉ. सुरेश मैंद यांनी काही सुचना मांडल्या. ॲड. निल हेळेकर यांनी लेखी स्वरूपात देण्याची विनंती सभागृहाला केली. डॉ. अजय भामरे आणि डॉ. सुरेश मैंद यांनी अनुमोदन दिले.

मा. अध्यक्षांनी सर्व उपस्थित संदस्यांचे सभेमध्ये सहभागी झाल्याबद्दल त्यांनी केलेल्या सर्व सहकार्याकरिता आभार मानून मुंबई विद्यापीठाच्या पुढील वाटचालीत सहकार्य तसेच सूचना करण्यासंबंधी आवाहन केले आणि सर्व सहकाऱ्यांप्रती आभार व्यक्त केले.

कुलसचिवांनी उपस्थित सन्माननीय सदस्यांनी, अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याकरिता आभार मानून मा. अध्यक्षांच्या वतीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने झाली.

..................
कुलसचिव (प्र)

..................
प्र-कुलगुरु

..................
मा. कुलगुरु